सज्जन तो सज्जन.

मनोरंजक आणि बोधपर कल्पित गोष्ट
इंग्रजी ग्रंथाच्या आधारानें

गणेश विष्णु साठे

इंग्लिश क्लार्क निसबत डे. ए. इन्स्पेक्टर, पुणे
ह्यांनीं लिहिलेली

ती

मुंबईंत,

"निर्णयसागर" छापखान्याच्या मालकांनीं आपल्या
छापखान्यांत छापून प्रसिद्ध केली.

आवृत्ति २ री.

१९००.

किंमत ४ आणे.

प्रस्तावना.

इंग्रजीमध्यें कांहीं गोष्टी फार मनोरंजक आणि धपर आहेत; आणि त्या इंग्लिश लोकांस फार आव- ात. त्यांतल्या एका गोष्टीचें प्रतिबिंब हें आहे. हें मच्या राष्ट्रांतल्या लोकांच्या मनोरंजनास आणि धास अल्पस्वल्प तरी कारणभूत होईल, अशी आशा आहे. ती परमेश्वर पूर्ण करो.

ह्या पुस्तकाचा हस्तलेख विनायक कोंडदेव ओक ह्यांनीं समग्र वाचून नीट केला, ह्याबद्दल मी त्यांचे फार उपकार मानितों.

अनुक्रमणिका

सज्जन तो सज्जन.

लंगडा जनू.

भाग पहिला

भुताचें माणूस झालें

कांचनपूर येथें एक कथिलाची खाण होती. तेथील घो- ड्यांची व्यवस्था जनू नांवाचा एक चाकर पाहात असे. परंतु त्याचा पाय मोडल्यामुळें त्यास जनू लंगडा असें नांव पडलें. त्या खाणीच्या एका बाजूस एक लहानशी झोंपडी होती, तेथें रोज निजत असे. एके दिवशीं सकाळीं तो तेथें कोठें दि- सला नाहीं, ह्मणून मंडळींनीं त्याचा पुष्कळ शोध केला; परंतु तो कोठेंही दिसेना. एकाएकीं तो नाहींसा झाल्यामुळें लोक मनातऱ्हेचे तर्क करूं लागले, व तेथील बेलदारांत चमत्कारिक व हास्यास्पद गोष्टी चालल्या. तेथें जे विचारी लोक होते, ते ह्मणूं लागले कीं, येथल्या स्थितीस कंटाळून त्यानें आपली सु- टका करून घेतली असावी. त्याचा मुळींच पत्ता लागेना ही खरोखर मोठ्या आश्चर्याची गोष्ट होती. ह्या आश्चर्याच्या गो- ष्टीबद्दल कितीएक दिवस चर्चा चालतां चालतां, शेवटीं ती मागें पडली. पुढें पुढें तर त्याच्या नांवाची देखील कोणास आठवण नसेना. सुमारें वीस पंचवीस वर्षांनीं तेथें कांहीं स्त्रिया व पु- रुष अशीं माणसें खाणी पहावयास आलीं. त्या वेळीं एक दोघांना मात्र त्याची आठवण झाली. पुढें सुमारें ३६ वर्षांचा

गळाल्या मतांची मंडळी जमली, व आपलें मत स्थापण्याकरितां, त्यांचीं बोलणीं सुरू झालीं. त्यांची मजल शिवीगाळीपर्यंत येऊन शेवटीं धक्काबुक्कीही सुरू झाली. तेव्हां त्या नवख्या मनुष्यानें मध्यें जाऊन सांगितलें कीं, "गृहस्थ हो, या भांडणांत कांहीं अर्थ नाहीं, जनू लंगडा ह्मणून तुह्मी ज्याला ह्मणतां, तो खरोखर मीच आहें."

सर्वजण—काय ! आमचा जनू! जनू अद्याप जीवंत आहे ! ! मोठीच आश्चर्याची गोष्ट ! अरे ! जनू लंगडा असा सभ्य गृहस्थ बनला, अं ! !

असें बोलत ते सर्व लोक त्याच्याबरोबर खाणीच्या शेवटापर्यंत गेले; पण तो लंगडा जनूसा त्यांना वाटला नाहीं. कारण, तो एका चारचाकी उत्तम घोड्याच्या सुरेख गाडींत बसून त्या खाणीच्या मालकाच्या घरीं गेला.

भाग दुसरा.

जाचानें भल्याचा बुरा होतो.

दुसरे दिवशीं खाणीचे मालक रघुनाथराव यांनीं जनार्दनपंतांस मोठी मेजवानी दिली. त्या दिवशीं खाणींतल्या कारखान्यांतले कांहीं मजूर व त्यांचे अधिकारी असे बरेच लोक मेजवानीस बोलावले होते. भोजनोत्तर जनार्दनपंतांनीं गमतीखातर आपला पूर्वींचा पोषाक केला. ह्मणजे आंगांत ती जुनी बंडी घातली व डोक्याला मळकी टोपी घातली. त्या पोषाकानिशीं त्यांस पहातांच तो ह्मातारा बेलदार हात जोडून ह्मणाला, "महाराज, झाली ती बरीच झाली. गरीबाचे अपराध पोटांत घाला. दुसरें आतां काय ह्मणूं ! तीं फटकुरें ह्या [illegible] टाकून

[illegible] रघुनाथराव [illegible]

णाले, "सत्यशीलांचें भाग्य फार मोठें असतें. त्याचें हेंच प्रमाण पहा."

हें शेवटचें वाक्य रघुनाथराव कोणच्या उद्देशानें ह्मणाले, हें लक्षांत न आल्यामुळें आपली सर्व हकीकत आह्मांस सांगावी, अशी विनंती मंडळींनीं जनार्दनपंतांस केली. मग सर्वांचे फार फार आभार मानून, मंडळीच्या मनोदयास्तव आणि रघुनाथरावाच्या आग्रहावरून जनार्दनपंतांनीं आपली हकीकत सांगितली. ती अशी:—

गृहस्थहो, मी ब्राह्मण असून गरीब कुळांतला आहें. परंतु माझा जन्म कोठें झाला? माझे वडील काय करीत असत? ह्याबद्दल चांगलीशी माहिती मला नाहीं, व सुदैवानें त्या माहितीची आतां मोठीशी अपेक्षाही राहिली नाहीं. मला लहानपणची चांगली आठवण झटली ह्मणजे एवढीच आहे कीं, येथील मुलांबरोबर खाणींतल्या मातींत मिसळलेलें अशोधित कथील निवडावें, आणि तें धुवावें, हें काम मी करीत होतों. त्या वेळीं मी ६ वर्षांचा होतों. तेव्हांपासून तेरा वर्षांचा होईपर्यंत मी त्या ठिकाणीं काम करीत होतों. तेराव्या वर्षापासून, माझी स्थिति सुधारत चालली, ही परमेश्वराची कृपा होय. कारण मला पूर्वीच्या कामांत फार कष्टांत दिवस काढावे लागले.

ज्यांच्या हाताखालीं मी होतों, ते मला फार निर्दयपणें वागवीत. परंतु आमच्या या यजमानांस त्याबद्दल कांहींच बातमी नसे; तेथें आह्मांस काम सांगणारी एक बाई होती. ती एकसारखी वसवस करीत असे. जणों काय तिच्या आंगांत वारें भिरलें होतें. ती स्वत: तर इकडची काडी तिकडे करीत नसे. पण उलटें आपलें सर्व खाजगी कामही आमच्यावरच लादीत असे. आणि मी सर्वांत लहान असल्यामुळें

मजकडून आपलें काम जास्त करवून घेई. तिचें काम जर मजकडून एखादे वेळीं झालें नाहीं, तर ती वारंवार माझ्या मजुरीचे पैसे अडकवून ठेवी. तरी, ती मला कदाचित् खूप मार देईल, या भीतीनें यजमानसाहेबांस ती हकीकत सांगण्याचा धीर मला होईना. परंतु मी असें ह्मणतों कीं, ईश्वर तिला निरंतर सुखी ठेवो. कारण, तेथें दरवाजावर जे एक करडे अंमलदार होते, त्यांचा जुलूम इतका असह्य होत असे कीं, आमची बाई त्यांच्या पासंगास देखील पुरावयासारखी नव्हती. सज्जांतून खाणींत वेगळाल्या दारांतून खालीं हवा सोडणें, व बाहेर घेणें, हीं कामें आह्मां दाहापांचांवर सोंपविलीं होतीं; परंतु वर सांगितलेल्या जुलमी गृहस्थानें तें सर्व काम एकट्या मजवर सोंपविलें. त्यामुळें मला मागें पुढें इकडे तिकडे इतकें फिरावें लागे कीं, मला एक अक्षर बोलण्यास देखील फुरसत नसे, व अति मेहनतीनें माझ्या पायांचे सांधे अगदीं ढिले पडत. इतकी जिवापाड मेहेनत जरी मी करीत होतों, तरी खाणींतले लोक वरचेवर पुरीशी हवा आह्मांस आंत मिळत नाहीं असें ह्मणून मजवर शिव्यांची लाखोली वाहीत, व याच्या सारखा आळशी मनुष्य त्रिभुवनांत नसेल असे वारंवार टोमणे मारीत. बाकी मी अहोरात्र त्या सज्ज्यांत जणूं काय अगदीं पुरून घेतलें होतें.

पुढें मी वाटतील तशा सबबी सांगूं लागलों; आणि खोट्यानाट्या सबबी सांगून हरतऱ्हेनें त्यांस फसवूं लागलों. कारण जुलूम आणि अन्याय यांनीं गांजलेला मनुष्य आपोआप कावेबाज आणि बेइमान होतो. त्यावांचून त्याचें चालतच नाहीं.

एके दिवशीं माझ्या बाजूचे खाणींतले सर्व दरवाजे आमच्या मालिक रखवालदारानें बंद केल्यामुळें मी माझ्या खोल-

त्यांच्या बाजूचे तीन दरवाजे मोकळे ठेवले. मोकळी हवा खालीं नसल्यानें आतां एक दोन दिवस लोक खाणींत काम करणार नाहींत असें मला वाटलें; परंतु माझी ही समजूत चुकीची होती. कारण थोड्याच वेळानें ताजी हवा न मिळाल्यामुळें खालीं एक इसम मेला अशी वार्ता माझ्या कानीं आली, त्यामुळें मला फार भय वाटलें

इतक्यांत चौकसनिसानें रखवालदारांस बोलावलें, तेव्हां त्यांनीं तो सर्व दोष माझ्या माथीं मारला. तेव्हां यांत माझी चूक नाहीं असें मीं सांगितलें. जो मनुष्य मेला ह्मणून बातमी पसरली होती तो मेला नसून बेशुद्ध पडला होता. आणि कांहीं वेळानें तो सावध झाला. परंतु "वड्याचें तेल वांग्यावर" या ह्मणीप्रमाणें चौकसनिसानें माझ्या सांगण्याकडे दुर्लक्ष करून त्या जुलमी अधिकाऱ्याच्या शब्दावर भरंवसा ठेवला व मला यथेच्छ मार दिला.

मीं यथेच्छ मार खाल्ला तरी पण, मी चौकसनिसास खरी हकीकत सांगितली, ह्मणून रखवालदार एकसारखा मजवर जळत असे. तरी अशा स्थितींत त्याच्या सहवासांत मी मोठ्या दुःखानें दिवस काढीत होतों; पण येथें दिवस कंठण्यापेक्षां मरण चांगलें, असें मला वाटूं लागलें.

भाग तिसरा.

सद्गुणांनीं सद्गुण वाढतात.

मी जेव्हां मोठा झालों, व माझ्या अंगांत जेव्हां बरीच ताकद आली, तेव्हां मजकडे दुसरें काम दिलें. तेव्हां मी मोठा मनुष्य आहें, असें समजून मला आनंद झाला. परंतु मी तेव्हां आळशी मंडळीच्या सहवासांत पडलों. त्या लोकांस सिग-

सिधा काम असल्यामुळें ते खुशाल मधून मधून इकडे तिकडे फिरत. त्यांना तीन किंवा पराकाष्ठा चार तासांपेक्षां जास्त काम पडत नसे. त्यांना थोडे श्रम करून मजूरीही पुष्कळ मिळे. ते सर्व पैसा आनंदानें दारू पिण्यांत उधळीत. परंतु हे खुशालचंद इकडे तर्र होऊन घरीं बायकापोरांचा उपासमार होऊं देत असतील, असें मला त्या वेळीं वाटलें नाहीं.

मीही तरणा जवान होऊन इतरांसारखा केव्हां वागेन व दारू पिऊन कधीं झिंगेन असें मला झालें. आणि ह्मणून इतरांप्रमाणें कामाची कुचराई करून चौकसनिसास फसविण्याच्या खटपटीस मी लागलों.

त्या वेळीं माझें वय १४ वर्षांचें होतें, व त्या कल्पना आणि संवयी, जर माझ्या आंगीं खिळल्या असत्या, तर माझें आयुष्य फार दुःखांत गेलें असतें; आणि कदाचित् त्या कारखान्यांतच माझा अंत झाला असता. परंतु सुदैवानें एक गोष्ट घडली तीमुळें माझ्या मनाचा व वागणुकीचा कल एकदम फिरला. ती गोष्ट अशी:—

माझ्या एका स्नेह्यानें रखवालदाराचें एक महत्त्वाचें हत्यार दारूच्या धुंदींत खोल खाणींतल्या एका कपारींत टाकलें. परंतु शुद्धीवर आल्यावर त्यास भय पडलें, तेव्हां तें काढून वर आणतांना मला उत्साह यावा ह्मणून त्यानें फार मादक असें मला मद्य दिलें. त्यामुळें, मला इतकी धुंदी आली कीं मी अगदीं बेशुद्ध झालों, व त्या स्थितींत अवसानानें व अविचारानें एकदम खालीं उडी टाकली.

उडी टाकल्यावर मी लागलाच शुद्धीवर आलों. कारण, माझा एक पाय मोडला; पण आश्चर्याची गोष्ट ही कीं, माझी मान बिलकूल दुखावली नाहीं. नंतर मला दोरांनीं बांधून

वर ओढून घेतलें, व घोड्याच्या तबेल्याजवळ एका झोंपडींत निजविलें. पण माझ्या पायाच्या एकसारख्या वेदना चालल्या होत्या.

मजवर हें संकट ओढवलें तेव्हां आमचे धनीसाहेब खाणींतच होते. मी पडलों असें पाहून दयार्द्र अंतःकरणानें ते पट्कन तेथें आले, व त्यांनीं वैद्यास बोलावणें पाठविलें आहे, ह्मणून मला सांगितलें.

वैद्य घरीं भेटले नाहींत; परंतु आमच्या धन्याच्या घरीं यादवराव नांवाचे एक वैद्य तेथें होते त्यांजकडे मला नेलें. त्यांनीं अलीकडे वैद्यकीचा धंदा अजिबात सोडून दिला होता, परंतु त्यांस ती बातमी कळतांच त्यांनीं लागलीच कृपा करून माझ्या पायाचें हाड नीट बसविलें.

वैद्याचें काम आटोपल्यावर आमच्या यजमानांनीं सांगितलें कीं जनोबा, कांहीं संकोच न बाळगतां, जें कांहीं तुला होत असेल अथवा हवें असेल, तें मोकळ्या मनानें स्पष्ट सांगत जा. त्यांचे त्या वेळचे अलौकिक उपकार मी कधींही विसरणार नाहीं. ह्यापूर्वीं ते मजशीं कधीं एक शब्दही बोलले नव्हते. परंतु ह्या वेळीं ते मजशीं इतक्या मधुर भाषणानें व कळवळ्यानें बोलले कीं, ते जणों काय दुसरेच कोणी गृहस्थ असावेत असें मला वाटलें.

त्या संकटांत त्यांच्या ममताळूपणाच्या वागविण्यानें आपण सदा त्यांचें उतराई व्हावें हा एक सद्गुण प्रथम माझ्या मनांत उत्पन्न झाला.

यादवराव वैद्यांनींही मजबद्दल फार खटपट केली. ज्या मनुष्यानें मला मद्य दिलें, त्यानें यजमानास असें सांगितलें कीं जनू खालीं डोकावून मद्यात असतां एकदम त्याचा झोंक गेलं

आणि तो पडला. अशी थाप मारून खरी हकीकत त्यानें छपविली. परंतु ज्या धन्यानें इतक्या कळवळ्यानें माझी योग्य तरतूद ठेविली, त्या उदार पुरुषापासून खरी हकीकत लपवूनि ठेवणें हें मला योग्य वाटेना, ह्मणून मीं इत्थंभूत हकीकत त्यांस सांगितली.

यादवरावांनीं माझी सर्व हकीकत ऐकली; पण ती सांगितल्याबद्दल मला पश्चात्ताप झाला नाहीं. कारण त्यांच्या मनांत असें आलें कीं, हा होतकरू मुलगा चांगला निपजेल; तेव्हां याच्यावर आपण परिश्रम केल्यास ते व्यर्थ जाणार नाहींत. तुझ्यासारख्या तरुण मुलानें अशा दुष्ट व्यसनाचा अंगीकार करावा, ही गोष्ट अति दुःखाची आहे. असें ह्मणून, त्यांनीं अशा व्यसनापासून किती भयंकर तोटे होतात, ते सर्व मला समजावून सांगितले. तशा भयंकर परिणामांची त्या वेळीं माझ्या मनांत कल्पना सुद्धां नव्हती.

आंथरुणावर पडलों असतां नानातऱ्हेच्या गोष्टींवर माझ्या मनांत विचार चालत. ज्या मंडळींत मी पूर्वी होतों, त्या दारूबाज व पशुतुल्य खाणींतल्या बेलदारांपैकीं, मी आजारी असता, एकानेंही मजकडे नुसतें ढुंकून पाहिलें नाहीं. परंतु तेथलीं थोर स्वभावाचीं वरच्या पायरींतलीं माणसें मधून मधून माझ्या समाचारास येत. तेव्हां त्यांची रीतभात मला आवडूं लागली, व त्यांच्यासारखें वागावें अशी इच्छा माझ्या मनांत स्वाभाविक उत्पन्न झाली.

माझ्याजवळून उठल्यावर ती मंडळी बाहेर दाराशीं वेळेचा व पैशाचा व्यय कसा करावा याबद्दल कांहींतरी गप्पा मारीत. त्यावरून मलाही वाटलें कीं, कांहीं थोडी शेतीभोती, बागबगीच्या. सत्तेचें घर हीं आपल्यास अवश्य असावींत. परंतु

या कामीं पैसे मिळविण्यांत आंग मोडून मेहेनत केली पाहिजे हें माझ्या लक्षांत आलें. याप्रमाणें आंथरुणावर आजारी पडण्यापूर्वी माझे विचार एक तऱ्हेचे होते, व आतां बरा होऊन आंथरुणावरून उठल्यावर ते दुसऱ्या तऱ्हेचे बनले. यापुढें मी गंभीर स्वभावाच्या उद्योगी पुरुषांचा समागम केला. त्यामुळें सर्व गोष्टींविषयीं माझे विचार अगदीं फिरले. पूर्वीच्या मित्रांच्या संगतीनें धन्याचें अमळ दुर्लक्ष झालें कीं कामांत कुचराई करावी; अशी मला संवय लागली होती. परंतु मी निराश्रित असतां संकटावस्थेंत जो थोर पुरुष मजशीं मित्राप्रमाणें वागला, त्याच्याशीं सदैव कृतज्ञतेनें वागावें असें मनांत येऊन कामांत कुचराई करणें ह्मणजे धन्याशीं लबाडी करणें आहे, असें मनांत येई, व त्यामुळें मी जास्त उमेदीनें काम करीं. अशा तऱ्हेनें कृतज्ञतेनें मी प्रामाणिक झालों.

माझ्या पायांत अमळ कसर राहिल्यामुळें व मी अशक्त झाल्यामुळें, माझ्यानें अतिशय काम होईना. ह्मणून चौकसनिसानें मला मुळींच कामावरून काढून टाकण्याचा विचार केला. परंतु ती गोष्ट माझ्या धन्यास आवडली नाहीं. ते ह्मणाले, जनूचा जर तुमच्या कामधंद्याला उपयोग होत नसेल, तर तो तबेल्यांतल्या घोड्यांच्या देखरेखीचें काम करील. त्या बिचाऱ्या लंगड्याच्या श्रमांवर फार पैसे मिळविण्याची माझी इच्छा नाहीं. करतां त्याची जेथपर्यंत येथें राहण्याची इच्छा असेल, तेथपर्यंत त्यानें खुशाल राहावें. येथें काम होत नाहीं ह्मणून त्याचा उपासमार होतां उपयोगी नाहीं; असे धन्याचे शब्द ऐकून त्याचें सदैव कल्याण होवो अशी मीं परमेश्वराची प्रार्थना केली, व त्या वेळेपासून धन्याची कोणीही उगीच नालस्ती केली तर त्याचें ह्मणणें मोडून काढण्याचें धैर्य मजमध्यें आलें.

मला त्या धन्याचा विशेष लळा लागला, त्याचें आणखी एक कारण असें होतें कीं आजपर्यंत मजशीं कोमल अंतःकरणानें, भूतदयेनें व न्यायानें वागला असा पहिला थोर पुरुष हाच होता.

भाग चौथा.

चोर उघाडीस आला.

एके दिवशीं त्या तबेल्यांत इतर मजूरांच्या नकळत काम करीत असतां, माझे पूर्वीचे स्नेही जे मजबरोबर काम करीत असत, त्यांपैकीं कांहींजण समोरच्या खिडकींतून आंत येतांना माझ्या दृष्टीस पडले. प्रथम एकानें मोठ्यानें आनंदानें टाळी वाजविली. तीसरसे एकामागून एक सर्वजण आंत घुंसले. त्यांनीं आपलीं हत्यारें खालीं टाकलीं, व ते सर्व एके ठिकाणीं जमा झाले. ह्या त्यांच्या कृतीवरून त्यांना कांहीं मोठ्या गोष्टीचा शोध लागला असावा, असें मला वाटलें. पुढें पाहातों तों खणण्याचें काम न करतां तेथील एक खळगा ते बुजवूं लागले. त्यांनीं त्यावर कचरा वगैरे बराच टाकला, तो अशा करतां कीं, तेथें कांहीं पुरलें असेल अशी शंका कोणास येऊं नये. तेथें त्यांनीं अष्टपैलू बिलोरी आकृतीचा एक मोठा खडा पुरलेला मीं पाहिला. तेथें खाणींत आणखी कांहीं तुकडे सांपडले तेही त्यांनीं पुरले. त्याचें कारण असें होतें कीं, तसे तुकडे सांपडले म्हणजे त्यांत कांहीं हिरे अवश्य सांपडतात. त्याकरितां ते तुकडे दृष्टीस पडल्यावर हिरे दृष्टीस पडले पाहिजेत, व ते तर आपण लांबविले आहेत, ह्यासाठीं कांहींच मागमूस चौकसनिसास लागूं नये, म्हणून त्यांनीं एवढी खटपट चालविली होती.

तो गुप्तपणाचा व्यवहार, एकमेकांचें कुजबुजणें, चौकसनिसानें त्या बाजूस न यावें म्हणून कांहींजणांचा त्यास दुसरीकडेच

नादीं लावण्याचा प्रयत्न, या सर्व गोष्टींवरून खाणीत सांपडले-ला व इकडे पुरून ठेवलेला मौल्यवान् माल आपसांत मशांत टाक-ण्याचा त्या मंडळीचा हेतु होता हें तेव्हांच माझ्या लक्षांत आलें.

त्या खाणींतून बाहेर जाण्यास एक चोरवाट होती ती त्यांस माहीत होती. त्या रस्त्यानें तो माल पळवून नेण्याचा त्यांनीं विचार केला. तो रस्ता खाणींतून एका सज्जांतून पर्वताच्या बाजूनें बाहेर जमिनीच्या सपाटीवर गेला होता. त्या रस्त्यानें शिडीची अगर सांखळीची गरज न लागतां वाटेल तेव्हां आंत बाहेर जातां येत असे, व जिन्नस वगैरे नेण्यासही सोपें जात असे.

हा रस्ता मीं स्वतः जाऊन पाहिला. तों ठिकठिकाणीं ब-राच चोरलेला माल लपवून ठेवलेला माझ्या नजरेस पडला. तेव्हां मी त्या टोळींतले मुख्य केसोबा यांजकडे गेलों, व त्यांस एकीकडे बोलावून त्यांची पुष्कळ तऱ्हेनें कानउघडणी केली. परंतु त्यानें माझी निर्भर्त्सना केली, व मला ठोसे दिले, आणि मी काय ह्मणालों तें आपल्या सोबत्यांस सांगून जनूस खरपूस मार दिला, हें पण त्यांस सांगितलें. तेव्हां त्या सर्वांचा विचार असा ठरला कीं, त्या कृत्यापैकीं यत्किंचितही बातमी यजमानांस कळली तर या राजश्रींचा यथेच्छ सूड घेऊं. त्या वेळेपासून जेव्हां जेव्हां यजमान तेथें येत, तेव्हां तेव्हां मला त्यांच्याशीं बो-लण्यास बिलकूल सवड मिळूं नये, ह्मणून त्यांची नजर एकसा-रखी मजवर असे; व कदाचित् मी यजमानांस एकांतीं भेटून कांहीं सांगेन ह्मणून ते मला त्या कारखान्याच्या बाहेर जाऊं देत नसत. घोड्यांची देखरेख याकाच चांगली करतां येते दुसऱ्या कोणास हें काम उरकणार नाहीं अशा सबबीनें रात्रंदिवस ते मला तेथून बाहेर जाण्याची फुरसत मिळूं देत नसत व एकदां तर त्यांनीं मला निक्षून सांगितलें कीं लंगड्या, पुन्ह

जर कां कांहीं शहाणपणा केलास तर ध्यानांत ठेव कीं या खाणींत कोठें तरी तुला जिवंत पुरून टाकूं.

"त्यांच्या हातून ही गोष्ट घडेल कीं नाहीं, ह्याची मला फार शंका होती. आणि त्यांचें कृष्णकारस्थान मीं गुप्त ठेवावें ह्मणून मला ती धमकी दिली असावी, असें मला वाटलें; तरी मी तरी खरोखरीच थोडासा घाबरलों. मग मनांत असें येऊं लागलें कीं, येथें आपल्यास सर्वजण तुच्छ मानतात, थट्टेनें लंगडा ह्मणून नेहेमीं हाक मारतात, शिवाय मारण्याची दहशत घालतात, तेव्हां अशा स्थितींत राहण्यापेक्षां, काय होईल तें होवो, धन्याच्या कल्याणाकरतां सत्कर्मी जीव गेला तरी बेहेत्तर आहे, असें वाटून, ती गोष्ट यजमानास सांगण्याचा मीं निश्चय केला.

शेवटीं यजमानाची व आपली गांठ कशी पडेल अशा विवंचनेंत असतां, एके दिवशीं यजमान तबेल्यांतील घोडे पाहण्यास आले. मी आनंदांत असून कामांत निमग्न आहें असें पाहून यजमान ह्मणाले, कसें काय जनोबा, ठीक आहे ना ? येथें बरें वाटतें ना ? मी ह्मणालों, महाराज, आपल्या कृपेनें सर्व कांहीं ठीक आहे—परंतु......परंतु असीं अक्षरें तोंडावाटे बाहेर निघताहेत, तों केसोबा, ह्मणजे ज्यांची नजर मजवर होती, ते आपले तेथें हजरच. यजमानांचें व माझें भाषण होऊं नये, ह्मणून त्यांनीं मला एक जरूरीची बाहेरची कामगिरी सांगितली. त्यामुळें मी निरुपायानें बाहेर गेलों. परंतु सुदैवाची गोष्ट ही कीं, मी परत येतांना रस्त्यांत यजमान मला एकटेच भेटले, तेव्हां मागची सर्व हकीकत व मी कशा संकटांत आहें, हें सर्व त्यांस सांगितलें. तेव्हां 'हरकत नाहीं, मजवर विश्वास ठेव, व आतां आपल्या मंडळींत जा,' असें त्यांनीं मला सांगितलें.

मी मंडळींत गेलों. परंत माझ्या चर्येंत त्यांस कांहीं फरक

दिसल्यामुळें केसोबा व त्यांचे साथीदार हे आपसांत भयानें कुजबुजूं लागले, व त्या चोरवाटेकडे आज कोणी बिलकुल जाऊं नये, असें ठरून माझा सूड पूर्णपणें उगवावयाचा असा त्यांचा निश्चय झाला.

भाग पांचवा.

सुशीलतेसारखें छत्र नाहीं.

त्या झोंपडींत मी रात्रीं एकटा निजलों होतों. पण मला झोंप कांहीं येईना. मला सर्व भय त्या मंडळीचें होतें. ती मंडळी मला डोळ्यांसमोर दिसत होती. बाहेर कांहीं खुट वाजलें कीं माझ्या आंगास घाम सुटे. परंतु बाहेर जाऊन पाहावें तों घोड्यांची दांडगाई. दुसरें कांहीं नसे. शेवटीं माझें मलाच हंसूं येई, व वाटे कीं धन्यानें जर आश्वासन दिलें आहे, तर मजसारखा निर्भय मनुष्य आज जगांत दुसरा कोणी नाहीं.

थोड्या वेळानें मला गाढ झोंप लागली. परंतु कोणी दार ठोठावल्यामुळें मी जागा झालों. डोळे उघडून पाहतों तों दिव्याचा उजेड दृष्टीस पडला, व एकदम नाहींसा झाला. त्यामुळें मीं स्वप्नांतच तो पाहिला असें मला वाटलें. पुढें नीट निरखून पाहतों तों हळूच एकानें दार उघडलें, व पुन्हा उजेड दृष्टीस पडला. आणि एका मनुष्याच्या हातांत मोठी बंदूक असून, त्याची खूप मोठी सावली तेथें भिंतीवर दिसूं लागली. मी अगदीं गर्भगळित झालों, व आतां माझे प्राण जातात असें मला वाटलें. त्या गृहस्थानें सर्वांगावर एक काळी घोंगडी लपेटून घेतली होती. त्याच्या डोक्यास कपाळपट्टीची बंदाची टोपी होती, व हातांत एक कंदील होता. तो कोणत्या टोळीचा मुख्य होता. तें मला समजलें नाहीं. परंत तो आतां मला

ठार मारणार अशी माझी खात्री झाली. भयानें माझ्या आं-
गास कंप सुटला. तथापि जेमतेम उभा राहून मी मोठ्यानें
ओरडून ह्मणालों, गृहस्था, मी मरण्यास तयार आहें. माझा
प्राण सत्कर्मी खर्च पडतो आहे. याजबद्दल मला आनंद होत
आहे; पण कृपा करून मला ५ मिनिटांची फुरसत दे. तेवढ्या
अवकाशांत मी आपल्या धन्याचें अभीष्ट चिंतन करतों. असें
ह्मणून मीं मनांत प्रार्थना केली, व तुमचें कृष्णकारस्थान
त्यांस मीं सांगितलें ह्मणून ह्या लोकीं जरी मला सुख नाहीं, तरी
ईश्वर मला परलोकीं सुखी ठेवो, असें ह्मणून आतां तुला हवें
तें कर, असें मी त्यास ह्मणालों. तो हा वेळपर्यंत माझ्या बि-
छान्याजवळ नुसता गपचिप उभा होता व मी भिऊन पळून
जाऊं नये ह्मणून एका हातानें त्यानें मला धरलें होतें. मी त्याज-
कडे टक लावून परिणामाची वाट पहात होतों. तों त्यानें कंदिल
आपल्या तोंडाशीं धरला; त्यामुळें त्याचें हास्यमुख माझ्या
दृष्टीस पडलें. मग मी विशेष बारकाईनें त्याजकडे पाहूं लागलों
तों, मला इतका आनंद झाला कीं, तो पोटांत माईना. महाराज,
त्या हर्षानें मला एकदम हुषारी आली. तो सद्गृहस्थ माझा
धनी रघुनाथरावच होता. इतक्यांत यजमान ह्मणाले, ऊठ
जनोबा, ऊठ. शत्रु व मित्र यांच्या मधला फरक आतां तुला
नीट कळला असेल. तर आंगांत कपडे घाल व तो खळगा
कोठें आहे तो दाखीव. मी लागलीच निघालों, व जेथें केर
टाकला होता त्या खालचा खळगा धन्यास दाखविला. मला
तेथून लौकर दुसरीकडे न्यावयाचें यजमानांच्या मनांत होतें,
ह्मणून तेही मजबरोबर खणूं लागले. आंतील जिन्नस पाहून
त्यांची खात्री झाली. नंतर तो खळगा पुन्हा पूर्वीप्रमाणें बुज-
वून वर कचरा टाकून, आह्मी गुप्त मार्गानें निघालों. तों ठिक-

ठिकाणीं चोरून नेण्याचा माल बांधून ठेवलेला दृष्टीस पडला. मग यजमान ह्मणाले, जनोबा, तुझें ह्मणणें अक्षरशः पटलें. तुझ्या विश्वासूपणाविषयीं माझी खात्री झाली आहे, व ज्या अर्थी थोड्या वेळापूर्वी मजकरतां तूं आपला प्राण देण्यास तयार झाला होतास, त्या अर्थी तुजसारख्या प्रामाणिक मनुष्याचा जीव वांचविणें हें माझें कर्तव्यकर्म आहे. तर, आतां तूं माझे मागोमाग ये.

त्या भाषणानें मला जास्त हुषारी आली व विशेष आनंद झाला. आणि मी भरभर चालूं लागलों. यजमानांनीं मला घरीं नेलें, व तेथें एका खोलींत निजावयास सांगितलें. ते ह्मणाले तूं जरी माझ्या आधीं सकाळीं उठलास, तरी खोलीचें दार उघडूं नको, अगर खिडकींतून डोकावूं नको. नाहीं तर तुला कोणी पाहील.

अहाहा ! तेथला तो मऊ बिछाना व ऊबदार पांघरुणें हीं माझ्या आंगास एवढ्या काळांत प्रथमच लागलीं, त्यामुळें मला गुदगुल्या होऊं लागल्या, व त्यामुळें मला सर्व रात्रभर झोंप आली नाहीं.

उजाडण्यापूर्वी यजमान माझ्या खोलींत आले, व माझ्या मागोमाग गुपचीप चल असें ह्मणाले. आह्मी दोन चार शेतें ओलांडून गेलों, तों पुढें एक मोठा रस्ता लागला. तेथें थोडा वेळ थांबल्यावर, एक घोड्याची गाडी आली, तेव्हां या गाडींत बसून तूं एदलाबादेस जा, तेथें माझे स्नेही यादवराव वैद्य आहेत, त्यांस तूं भेट, हें पत्र त्यांस दे, ह्मणजे ते तुझी सर्व व्यवस्था नीट लावतील, असें ह्मणून ५० रुपये मला खर्चण्यास देऊन त्यांनीं मला गाडींत बसविलें. त्यांनीं मला असेंही सांगितलें कीं, आह्मीं नवीन खाण सुरू केली आहे. तिच्या नफ्यांतून

दरसाल १२५ रुपये तुला यादवरावमार्फत देऊं, परंतु तुझी वर्तणूक नेहमीं चांगली असली पाहिजे. बरें तर आतां नमस्कार. तुझें ठीक चाललें आहे असें मीं सदां ऐकावें, व मजजवळ जसा तूं प्रामाणिकपणानें वागलास, असाच कोणाही धन्याजवळ असलास तरी वागत जा एवढेंच माझें सांगणें आहे. त्यांच्या त्या प्रेमाच्या भाषणानें माझी छाती आनंदानें भरून आली. तेथून जाणें माझ्या जिवावर आलें, माझ्या तोंडांतून शब्द निघेना, तरी कष्टानें मीं ह्मटलें, 'महाराज, आपल्यासारखा कनवाळू धनी पुन्हा मला मिळावयाचा नाहीं,' नंतर मी त्यांच्या पायांवर डोकें ठेवून त्यांचा निरोप घेतला.

भाग साहावा.

सत्समागमाचा महिमा.

आमचे यजमान अगदीं दृष्टीआड होतपावेतों मी त्यांजकडे एकसारखा पाहात होतों; परंतु ते दिसेनातसे झाल्यावर माझें मन दुसरीकडे वळलें. बाळपणापासून मला खाणीच्या बाहेर जग काय आहे, तें माहीत नसल्यामुळें, सृष्टिसौंदर्य पाहून माझें मन दंग झालें.

आमच्या गाडीवानानें आकाशाकडे पाहिलें व मेघ नाहींतसे झाले असें पाहून तो ह्मणाला, आज सूर्यदर्शन मोठें आनंदकारक होईल. इतकें ह्मणून तो शीळ वाजवूं लागला. पण मी सूर्यबिंब पाहण्यास मोठ्या आश्चर्यानें एकदम उभा राहिलों. त्या आश्चर्याच्या भरांत मी काय बोललों, त्याचें मला स्मरण नाहीं. परंतु तो गाडीवाला पोट धरून मोठ्यानें हसूं लागला, व ह्मणाला, अहारे वेड्या, शुद्धींत आहेस ना ? सूर्यदर्शनाकरतां एवढी तयारी ! जसा कांहीं सूर्य कधीं पाहिलाच नाहीं !

ती त्याची कल्पना माझ्या संबंधानें खरीच होती. पण मी लागलाच गाडींत बसलों. कारण, मला वाटलें कीं कदाचित् येथें कोणी खाणींतले मजूर मला ओळखतील व परत खाणींत जावें लागेल.

मी अशा काळजीनें वागलों हें एक प्रकारें चांगलें झालें. कारण, कीं बेलदारांच्या टोळीचा मुख्य केसोबा हा लौकरच समोरून आला, व आतां किती वाजले असतील म्हणून त्यानें गाडीवानास विचारलें. मी जो एकदां खालीं मान घालून गाडींत सामानाच्या आड दडून बसलों, तो बराच वेळपर्यंत तेथें पडून राहिलों. कारण बाहेर डोकें काढण्याचें मला धैर्य होईना.

दुसरे दिवशीं मात्र मला खूप धैर्य आलें, मी वरचेवर गाडी-खालीं उतरून मधून मधून चालत जाई. रस्त्यानें नानातऱ्हेचीं झाडें, पशु, पक्षी, फुलें, व फळें माझ्या दृष्टीस पडत, व मी ठिकठिकाणीं तीं पाहण्यास्तव मोठ्या उत्सुकतेनें उभा राहीं. परंतु अशी जिज्ञासा मला कां होते, याचें कारण गाडीवानास ठाऊक नसल्यामुळें मी वेडगळ आहें, असें समजून तो घोडे हांकी.

एकदां अशी कांहीं मजा झाली कीं, सुमारें दोन फूट उं-चीचें एक झाड माझ्या दृष्टीस पडलें, त्याला अशीं कांहीं सुरेख फुलें आलीं होतीं कीं त्यांचा सुगंध घ्यावा असें मला वाटलें, म्हणून मीं त्या फुलांजवळ नाक नेलें, तों माझ्या कपाळाला व गालाला कांटे लागले आणि त्यामुळें मीं रडवें तोंड केलें. तें पाहून गाडीवान म्हणाला, हा बेट्या, अरे, हें कांटेरी झाड, याच्या जवळ जाऊं नये, एवढें नाहीं का तुला कळत ? तुझ्या पेक्षां माझीं घोडीं देखील जास्त शहाणीं आहेत. तीं तर अशा झाडांपासून दूर अंतरावरून चालतात !

त्यानंतर तो गाडीवान मला अगदीं मूर्ख समजूं लागला.

पुढें दुसऱ्या गांवीं आम्ही पोहोंचलों. तेव्हां त्यानें मजकडे नि रखून पाहिलें. मी त्या वेळीं खरोखरच थट्टा करण्यासारखा दिसत होतों; कारण माझ्या टोपीस व आंगरख्यास जागजागीं कांटे, गवत, रानफुलें, वगैरे चिकटलेलीं दिसत होतीं, व खिसे गारगोट्या, कांचा, खडे, लांकडाच्या आकृति इत्यादिकांनीं भरलेले होते.

तो गाडीवान मजकडे इतक्या तिरस्कारबुद्धीनें पाहूं लागला कीं, माझें मलाच आश्चर्य वाटून मीं आपली टोपी व आंगरखा हीं अगदीं साफ केलीं; आणि शहरांत जाण्यापूर्वी खिशांतलें रत्नभांडार सर्व फेंकून दिलें. शहरच्या एका बाजूस पाहिलें तों मोठा विस्तीर्ण समुद्र दृष्टीस पडला. त्याचेंही सूर्यदर्शनाप्रमाणेंच मला आश्चर्य वाटलें; परंतु फजितीच्या भयानें आश्चर्यकारक असा एकही शब्द मीं उच्चारला नाहीं. तरी मोठमोठीं जाहजें व होड्या दृष्टीस पडल्यावरून त्यांजबद्दल मीं कांहीं प्रश्न त्या गाडीवानास विचारले. परंतु त्यांत कांहीं विशेष नाहीं. असें ह्मणून तो आपल्या उद्योगास लागला.

त्या मनुष्याबद्दल माझ्या मनांत चांगला ग्रह झाला. कारण, मला ज्या गोष्टींबद्दल आश्चर्य वाटे, त्या त्याच्या पुऱ्या माहितीच्या होत्या. शिवाय पुढच्या पांच दिवसांच्या प्रवासांत त्यानें मजशीं फारशी चरचर केली नाहीं. ह्मणून त्याच्याबद्दल माझ्या मनांत पूज्यभाव उत्पन्न झाला. पहिल्याच प्रवासांत मला असा सोबती मिळाल्यामुळें आनंद वाटला. कारण मी पुष्कळ गोष्टींच्या संबंधानें अगदीं अडाणी आहें, अशी त्यानें माझी खात्री करून दिली व जी माहिती मला नव्हती ती करून दिली.

शेवटीं आम्ही एदलाबादेस पोहोंचलों. तेथें आम्हांला याव-

वरावांचें घर सांपडण्यास फार त्रास पडला. चाकरानें यज-मान आतां रात्रीच्या वेळीं भेटणार नाहींत ह्मणून सांगितलें, पुढें हो ना करतां माझें पत्र त्यानें आपल्या धन्यास दिलें. तें पाहतांच यादवरावांनीं मला वर बोलावलें.

तेथें ते वृद्ध वैद्य आपल्या मित्रासह भोंवताली मुलें घेऊन बसले होते, व हातांतली कांचेची एक नळी दोन समंजस मुलांस ते दाखवीत होते. तीं मुलें नळी पाहाण्यांत निमग्न झालीं होतीं. माझ्या पूर्वीच्या यजमानाचें पत्र वाचून ते मजशीं गोड बोलले, व माझ्या सामर्थ्यानुरूप कामधंदा पाहून देण्याचें अ-भिवचन त्यांनीं मला दिलें व तेथपर्यंत तेथें खुराक राहाण्याची परवानगी दिली. परंतु तेथें बसण्यास मला संकोच वाटला असें पाहून त्यांनीं मला खालीं जावयास सांगितलें.

दुसरे दिवशीं त्या खोलींत ते एकटे बसले असतां त्यांनीं मला बोलाविलें, व पुष्कळ प्रश्न विचारले. त्यांचीं सरळ उ-त्तरें ऐकून ते खूष झालेसे दिसले. मी विलक्षण जिज्ञासेनें खो-लींतल्या नानाप्रकारच्या वस्तूंकडे पाहात आहें, असें पाहून त्यांनीं काल जी कांचेची नळी त्या मुलांस दाखविली, तीच मला दाख-वून विचारलें कीं, अशा प्रकारची नळी तुझ्या खाणींत तूं कधीं पाहिलीस का? तेव्हां मीं सांगितलें कीं आमच्या चौकसनिसाच्या हातांत अशी एक नळी असे; पण तिचा उपयोग ते काय करीत तें मात्र मला ठाऊक नाहीं. तें थंडी व उष्णता मोज-ण्याचें यंत्र होतें. यादवरावांनीं मोठ्या आस्थेनें त्याचे कोठें व काय उपयोग करावे ते मला नीट समजून सांगितले.

आतां माझी गांठ निबळ गाडीवानाशीं नव्हती, तर मला मोठ्या हुशारीच्या मनुष्याबरोबर वागावयाचें होतें. तरी तो हु-हस्व गाडीवानाप्रमाणें मला मर्म मानीत नसे. याचें मला आश्चर्य

वाटून त्याच्याविषयीं मजमध्यें कृतज्ञताबुद्धि उत्पन्न होई. ते गृहस्थ माझ्या प्रश्नांचीं उत्तरें प्रेमपूर्वक देत, व शिवाय असें-ही ह्मणत कीं, हा प्रश्न शहाणपणाचा आहे.

आह्मी त्या शीतोष्णमापक यंत्राविषयीं बोलत असतां, त्या यंत्राच्या हस्तिदंती पट्टीवर कढ येण्याचा बिंदु, थिजण्याचा बिंदु, इत्यादि शब्द लिहिले होते, ते मला वाचतां येईनात. तेव्हां त्यांनीं मला लिहिणें वाचणें शिकविण्यास प्रारंभ केला; व शिकल्यापासून काय फायदे होतात ते सांगितले. त्यांच्या ना-तवांस जो शिकवीत असे, त्या शिक्षकाजवळ मला शिकण्यास सांगितलें. मी मोठ्या आनंदानें शिकूं लागलों, व जनूं हें नांव दगडावर कोरलें होतें, त्यापेक्षां सुरेख काढूं लागलों. माझे शिक्षकही माझा अभ्यास पाहून संतुष्ट झाले. यादवरावांनीं मला अनेक प्रकारचीं पुस्तकें वाचावयास दिलीं—मनोरंजक पु-स्तकें मीं वाचलीं, कवितांचा अभ्यास केला,—नीतिवर्धक पु-स्तकें वाचलीं. अशा तऱ्हेनें मला विद्येची गोडी लागल्यावर ते ह्मणाले, तुला पोट भरण्याची विद्या आधींपासून येतच आहे, तेव्हां त्याबद्दल विशेष काळजी नाहीं. माझ्या घरीं आचारी, पाणके, माळी वगैरे मंडळी सुद्धां काम करून उदरनिर्वाह करतात. शिक्षकही काम करून पैसे मिळवितो. परंतु विद्या ही श्रेष्ठ अस-ल्यामुळें इतर लोकांपेक्षां शिक्षकास मला पैसे जास्त द्यावे लागतात. तेव्हां आपल्या ज्ञानाचा सदुपयोग करून इतरांपेक्षां संभावित रीतीनें तूं आपला चरितार्थ करावास असा मला त्यांनीं पुष्कळ उपदेश केला; व मीही त्याप्रमाणें वागण्यास तयार झालों. तेव्हां लहानांनीं थोरांचा उपदेश लक्षपूर्वक ऐकून तदनुसार वागावें त्यांत हित असतें, व आपला हट्टीपणा सोडून द्यावा.

कारण, तो परिणामीं हितावह होत नाहीं, हीं दोन तत्वें माझ्या मनांत चांगलीं बिंबलीं.

भाग सातवा.

भूत हा सगळा भ्रम आहे.

ज्या दिवशीं यादवरावांनीं मला उपदेश केला, त्याच दिवशीं आपल्या वडील मुलास खाणींतल्या वेगळाल्या द्रव्यांचीं नांवें शिकविण्यास मला सांगितलें. ती माहिती फार उपयोगाची आहे, असें आपल्या मुलांस सांगून खाणीचा कारखाना कसा चालवितात तें समजून देण्याबद्दल मला त्यांनीं सुचविलें. माझ्या शक्त्यनुसार मीं त्यांस समजून सांगितलें व त्या तुटपुंजी माहितीनें देखील त्यांना इतकी मौज वाटली कीं, त्यांच्या करमणुकीकरतां आपण खाणीचा एक जस्ती नमुना तयार करावा असें मला वाटलें.

परंतु तें काम कांहीं सोपें नव्हतें. मीं जरी त्या खाणींत जन्म घालविला, तरी तेथील वेगळाल्या भागांची लांबी रुंदी मला ठाऊक नव्हती. शिवाय यादवरावांजवळ जरी खाणींतल्या वेगळाल्या नमुन्यांच्या दगडांचा बराच संग्रह होता, तरी त्यांची बरोबर माहिती करून देण्यास कांहीं हत्यारांची अवश्यकता होती.

तें काम तडीस न्यावयाचें असें मनांत येतांच नमुन्याची एक खाण करून सबंध कारखाना जारीनें चालू आहे असें हुबेहूब प्रदर्शन नवीन धन्याच्या मुलास दाखवावें असा मीं निश्चय केला. ही कल्पना मनांत शिरल्यावर ती खरी करून धन्यास दाखवावी, व आपण उद्योगी असून आपल्या आंगीं कांहीं करामत आहे, अशी धन्याची खात्री करून द्यावी, म्हणून मी त्या उद्योगास लागलों. आतां त्या कामीं ज्या ज्या गोष्टींची उणीव होती.

त्री भरून येण्याकरतां पहिल्या यजमानांची परवानगी घेऊन एक रात्र खाणींत काढण्याचा मीं निश्चय केला.

मग एका क्षणाचाही विलंब न करतां मी खाणीकडे जाण्यास निघालों. रस्त्यानें जातां जातांना माझ्या मनांत वाटलें कीं, खाणींतून मी एकदम नाहींसा झालों, ही गोष्ट आतां लोकांच्या फारशी ध्यानांत राहिली नसेल. कित्येकांस तर माझी आठवणही होत नसेल, व ज्या टोळींतल्या लोकांनीं माझा सूड घेण्याचा निश्चय केला होता, त्यांचें कृष्णकारस्थान उघडकीस येऊन यजमानांनीं त्यांस हांकून दिलें असेल, तेव्हां आतां मला तेथें कांहीं भय नाहीं.

जसजसा मी यजमानांच्या घराजवळ जवळ येत चाललों, तसतसा लोकांच्या दृष्टीस पडूं नये असें मला वाटलें; म्हणून मी यजमानांस एकांतीं भेटलों. यादवरावांनीं दिलेलें पत्र त्यांस दिलें, व माझ्या चांगल्या वर्तणुकीचा दाखला त्यांस दाखवून तेथें येण्याचें कारण त्यांस सांगितलें. आणि मोठ्या आर्जवानें त्या रात्रीं खाणींत जाण्याची परवानगी मागितली.

त्यांनीं मोठ्या संतोषानें माझें म्हणणें मान्य केलें. माझ्या येण्यापासून त्यांस आनंद झाला, व येथें आसपास पूर्वीच्या टोळींतलीं माणसें तुझा सूड उगविण्याच्या विचारांत आहेत, शिवाय खाणींत जो मनुष्य निजला आहे त्यास तूं उठवूं नको व उजाडण्यापूर्वी येथून निघून जा, असें त्यांनीं मला सांगितलें.

माझे चांगले कपडे मळूं नयेत, म्हणून मी यजमानांकडून माझी जुनी बंडी, गळ्यास गुंडाळण्याचें फडकें, डोक्याची टोपी, एक कंदील, व मोजण्याची सांखळी इतकें सामान घेऊन निघालों.

मी हळूच त्या खाणींत गेलों. ती सर्व जागा नीट पाहिली, तेव्हां 'कोणत्याही गोष्टीची पुरी माहिती करून घेतल्याखेरीज

त्या ज्ञानाचा कांहीं उपयोग होत नाहीं,' असें यादवराव ह्मणत होते, त्याची मला आठवण झाली. तेव्हां नवीन यजमानाची पुरी खातरी करण्याकरितां मीं प्रत्येक पदार्थाचें मेजमाप टिपून घेतलें. त्या वेळीं त्या कामांत मी इतका निमग्न झालों कीं, केसोबा व त्यांचे साथीदार यांची मला बिलकूल आठवण झाली नाहीं, व तेथें निजलेल्या मनुष्याचीही मला आठवण झाली नाहीं. पण मग इतका वेळपर्यंत तो जागा झाला नाहीं, याचें मला फार आश्चर्य वाटलें.

परंतु तेथें कांहीं नमुन्याचे खडे वेंचीत असतांना मला एके ठिकाणीं थोडें खणावें लागलें, त्यामुळें तो जागा झाला असावा. इतक्यांत एक मोठा दगड सुटावून धाडकन् खालीं पडला. त्यासरसा मी दचकून कोणाच्या लक्षांत येऊं नये ह्मणून थोडा वेळ सज्ज्यांत लपून बसलों. मी तेथें पोहोंचतों आहें तों तेथला मनुष्य सज्ज्याच्या टोंकास माझ्या दृष्टीस पडला. आमची दृष्टादृष्ट होतांच त्यानें भयानें किंकाळी फोडली, व मागल्या पायीं धावऱ्या धावऱ्या निघाला. तेव्हां मला वाटलें कीं, येथें हें भूत आलें असावें अशा संशयानें त्याची गाळण झाली असावी. तशांत मींही अमळ काठी वगैरे वाजविली त्यावरून हें पिशाच आपल्याच मागें लागलें आहे असें त्यास वाटलें. नंतर मी सर्व जिनसा एका टोपलींत भरून निघालों. तो हळू हळू एदलाबादेस सुखरूप पोहोंचलों.

भाग आठवा.

उद्योग हा कल्याणाचा पिता होय.

माझा खाणीच्या कारखान्याचा नमुना अगदीं पुरा होईपर्यंत तो यादवराव अगर त्याजे चिरंजीव यांस दाखवावयाचा नाहीं,

अशा माझा संकल्प होता. त्या नमुन्याची पूर्तता करण्यास मीं एक उत्तम कारागीर सुतार आणविला; त्याच्या मदतीनें सर्व तऱ्हेचीं हत्यारें लांकडाचीं तयार केलीं. तसेच कांहीं लांकडी मजूरही बनविले. पुढें कांहीं वस्तु लोहार, कुंभार यांच्या जवळून तयार करून घ्याव्या लागल्या, व त्या कामीं मीं बरेच पैसे खर्च केले.

इतकी तयारी झाली, पण आमच्या नामधारी मजुरांनीं लोकांस आमच्या हुकुमावरून कामें कशीं करून दाखवावीं, ही एक मोठी पंचाईत पडली. मग लोकांस न दिसतील अशा काळ्या बारीक तारा मी त्या बाहुल्यांच्या डोक्यांस, गळ्यांस, खांद्यांस, हातांस, कमरेस, व पायांस बांधिल्या. इतका बेत जमल्यावर आह्मी त्यांच्याकरतां वेगळाले पोषाक तयार केले, व रंग देण्याचें काम सुरू केलें. बायका, पुरुष, मुलें अशीं चित्रें तयार झाल्यावर मी खेळ करून दाखविण्यास इतका उतावळा झालों कीं, त्यांचे रंग केव्हां वाळतील असें मला झालें.

आज रात्रीं कथलाच्या खाणीचें प्रदर्शन मी करून दाखविणार आहें, असें यादवरावांस सांगितलें. तेव्हां पहिली वेळ असल्यामुळें घरच्या मंडळीखेरीज दुसरे कोणास बोलवावयाचें नाहीं, असें ठरलें. मीं तरी तें प्रदर्शन त्यांच्याच करतां केलें होतें. परंतु तें माझ्या समजुतीप्रमाणें चांगलें झालें आहे असें वाटल्यावरून गांवच्या इतर संभावित लोकांनींही तें पाहण्यास यावें असें मला वाटलें. तथापि अनुभवशीर वृद्ध मनुष्याच्या धोरणानें चालणें हेंच चांगलें, असें मला रात्रीं अनुभवास आलें. आमच्या प्रदर्शनाचें बाह्य स्वरूप तर खूपच उत्तम वठलें. परंतु कारखान्याच्या कामास सुरवात केली, तेव्हां पुष्कळ चुका आढळल्या. त्यांत एक हातारा गृहस्थ केला होता, त्याचे हात आह्मीं

कसे जरी फिरविले तरी ते ताठच राहात–कोंपराचे ठिकाणीं वांकत नसत. तेथें एक म्हातारी बाई हट्टखोर होती तिला सांगून काम करावयास सांगितलें कीं, ती आपली एकदम हाता-पायां पडे. आमच्या मुलांपैकीं एक मूल खेरीज करून बाकी सर्वांनीं आपापलीं कामें फारच कुशलतेनें केलीं. त्यांनीं खण-लेल्या मातींतून निवळ माती एका बाजूस काढून ठेवली, व दुसऱ्या बाजूस अशोधित जस्ताचा ढीग करून ठेवला तो देखावा फारच प्रेक्षणीय झाला. एका गोष्टींत मात्र माझी खूप फजिती झाली. ती अशी कीं, एका मुलाची मान अगदीं वांकडी दिसत होती, परंतु त्याजकडे फार मोठें काम असल्यामुळें तो वरचेवर लोकांच्या नजरेसमोर येई, व गाडींत सामान भरतांना आणि उतरतांना तो लोकांच्या दृष्टीस पडला कीं त्याचें पाहाणें पूर्वेकडे व काम करणें दक्षिणेकडे असें होऊन सर्व मंडळींत एकच हंशा पिके. त्यामुळें मला खालीं मान घालावी लागली.

हा सर्व खेळ चालत असतां मी पडद्यामागें एकसारखा घा-माच्या धारा पुशीत होतों. कारण, खरोखरच्या खाणींत काम करण्यापेक्षां या नकली प्रदर्शनांत तेथें मला सर्व दिवस जिवा-पाड मेहेनत करावी लागली.

प्रदर्शनाचें काम आटोपल्यानंतर, यादवराव मजकडे आले, व मी कष्टी झालों आहें असें पाहून त्यांनीं माझें शांतवन केलें. ते ह्मणाले, जनोबा, थोड्याशा चुका ह्या वेळीं झाल्या, तरी हरकत नाहीं; असें ह्मणून त्यांनीं ज्या ज्या सुधारणा करावयास पाहिजेत होत्या त्या मला सांगितल्या. ही सर्व खटपट तूं माझ्या मुलांच्या करमणुकीकरतां व कल्याणाकरतां केली आहेस, हें मी जाणतों, करतां ही सर्व खटपट तुझ्या फायद्याची बाब होईल, असें घड-विण्याची मी खटपट करीन, असें ते ह्मणाले.

माझी एक खेळ दाखविण्याची उंच पेटी यादवरावांच्या खोलींत राहिली होती, ती मी पाहूं लागलों. लोकांनीं खेळ पाहावा ह्मणून वरच्या बाजूस तिला एक भोंक ठेवलें होतें त्या ठिकाणीं पाहातों तों एक भिंग बसविलेलें माझ्या दृष्टीस पडलें. तें पाहून मला फार आश्चर्य वाटलें. मला असा आश्चर्यचकित पाहून त्यांचा वडील मुलगा ह्मणाला, जनोबा, त्यांतून एकदां आंत तर पहा. आंतून समोरला देखावा दृष्टीस पडतांच मी आनंदानें ह्मणालों, अबब ! काय तरी चमत्कार हा ! ! सगळा प्रकार मोठ्या जिवंत माणसांसारखा दिसतो ! भावल्या, गाड्या, सर्व कांहीं हुबेहूब दिसतें ! ! वाहवारे गंमत !

यादवराव ह्मणाले, माझ्या मुलाच्या सांगण्यावरून मीं त्या पेटीला हें भिंग बसविलें. या भिंगांतून पुढील पदार्थ असतील त्यापेक्षां खूप मोठ्या आकाराचे दिसतात. माझ्या मुलानें हें तुला नजर केलें आहे. तर आतां सर्व व्यवस्था करून दुसऱ्या प्रदर्शनाची तयारी कर. या शहरांत एक कारागीर घड्याळें नीट करणारा आहे, तो मोठा चतुर आहे. तर खेळणार मंडळीच्या हातापायांच्या गति तो नीट सुधारून देईल.

एदलाबादेस कांहीं सुशिक्षित मंडळीचा एक मेळा होता. ती मंडळी दर आठवड्यास एके ठिकाणीं जमे. मीं दुसरें प्रदर्शन दाखविलें त्या वेळीं बरीच मंडळी कथलाच्या खाणीच्या कारखान्याचें प्रदर्शन पाहाण्यास आली होती. या वेळीं उगीच एखाददुसरी चूक झाली. परंतु एकंदरींत मंडळी अगदीं खुष झाली. या वेळीं माझ्या श्रमांचें चीज नुसत्या गोड भाषणांनीं मंडळीनीं केलें असें नाहीं; परंतु मला थोडीबहुत किफायतही करून दिली

वाटखर्चाचे व यंत्र तयार करण्याचे सर्व पैसे देऊन बाकल्यादर माझ्या जवळ त्या दिवशीं ६५ रुपये शिलक राहिले. आज-

न्मांत ६५ रुपये एकदम दृष्टीस सुद्धां पडले नव्हते. ते आज एकदम प्रत्यक्ष हातांत आल्यामुळें मी एक मोठा श्रीमान् गृहस्थ आहें असें मला वाटूं लागलें. एकदम संपत्ति मिळाली ह्मणजे लोक जसे चैनींत पैसे उधळून टाकतात, तसेंच मींही केलें असतें; परंतु माझे हितकर्ते यादवराव यांनीं मला त्याच वेळीं सदुपदेश केल्यामुळें तें अरिष्ट मजवर ओढवलें नाहीं. एकदां एक व्यापारी नाशिकचा उत्तम पेला घेऊन चालला असतां मला तो घ्यावासा वाटला, व मी विशेष चौकशी न करतां अडीच रुपयांस तो पेला विकत घेतला. तो जेव्हां मीं यादवरावांस दाखविला, व त्याची किंमत सांगितली तेव्हां ते ह्मणाले, काय वेडेपणा हा ! एक तर ही वस्तु निष्कारण विकत घेतलीस, व दुसरें असें कीं १॥ रुपयाच्या पेल्यास २॥ रुपये दिलेस. अशाच तऱ्हेनें वागल्यास तुला भाजीभाकरही पोटभर मिळणार नाहीं. तूं कितीही कुशल झालास व मेहेनतीनें काम केलेंस तरी अशा कृत्यांनीं भिकारी होशील. करतां 'उद्योगानें पैसा मिळवावा, व शहाणपणानें त्याचा खर्च करावा' हीं अक्षरें नेहेमीं ध्यानांत ठेव. माझ्या धन्याचें तें वाक्य माझ्या शिलकी पैशापेक्षां दसपट किंमतीचें आहे, असें मला मग वाटूं लागलें.

भाग नववा.

सहनशीलतेचें फल.

मला माझ्या सर्व साहित्याचा उपयोग दुसरीकडे लौकरच करण्याचा प्रसंग येणार होता, ह्मणून मला आनंद झाला. तुला योग्य अशी एक नौकरी मीं पाहून ठेवली आहे; तेव्हां तेथें तूं आनंदानें काम करशील, असा मला भरंवसा आहे. तुझे नमुने मीं प्रथम पाहिले तेव्हांच मला वाटलें कीं या धंद्यांत

तुला कांहीं चांगली किफायत होईल, अशी तजवीज करावी धंदेशिक्षणावर चांगलें व्याख्यान देऊन खाणींतल्या कामांच्या यंत्रांचे नमुने दाखवील, असा एखादा मनुष्य पाहाण्याच्या खटपटींत माझे एक स्नेही होते; तेव्हां त्यांस दुसऱ्या प्रदर्शनाचे वेळीं मीं बोलावलें होतें. तुझीं एकंदर यंत्रें वगैरे पाहून ते फार खूष झाले व त्यांचाच एक नातलग व्याख्यानकार आहे, त्याच्या बरोबर तुला पाठविण्याचें ते कबूल करीत आहेत. बाकी व्याख्यानें देणाऱ्या मनुष्याचें ज्ञान सरासरीच आहे; पण तेथें कांहीं इलाज नाहीं.

मी यादवरावांबरोबर प्रथम त्यांजकडे गेलों, तेव्हां व्याख्यानकारांनीं मजशीं उद्धटपणाचें वर्तन केलें. ती गोष्ट यादवरावांच्या लक्षांत येतांच, त्यांनीं मला सांगितलें कीं, 'तूं त्यांच्या उपयोगीं पडलास, ह्मणजे मग तूं त्यांना प्रिय होशील. जगांत आपण जेथें जावें तेथें आपल्याकरतां तयार असे मित्र नसतात तर मोठ्या मेहेनतीनें व काळजीनें मित्र मिळवावे लागतात.' त्यांनीं सांगितल्याप्रमाणें त्या व्याख्यानकारांचें मित्रत्व संपादण्यास मला फार दगदग करावी लागली. ते थोरकुळांत जन्मल्यामुळें हा भिकार मनुष्य कसा तरी योग्यतेस चढला आहे झालें असें ह्मणून ते माझा तिरस्कार करीत. गर्भश्रीमान् काय ते आह्मी, व ज्ञानभांडार तरी आमच्यांतच भरलें आहे, अशी त्यांना फार घमेंडी होती. माझा जन्म थोर कुळांत झाला नाहीं, ही गोष्ट मला मान्य होती, व त्याची लाज बाळगण्याचें मला कारणही नव्हतें; परंतु मी केवळ प्रामाणिकपणानें वागून योग्यतेस चढलों, याजबद्दल मला अभिमान असे, व त्याबद्दल आमचे व्याख्यानकार वारंवार मला कांहीं तरी लावून बोलत. मला जी गोष्ट माहीत नसे, ती मला येते असा दांभिकपणा मी कधींही करीत

नसे, त्यामुळें त्यांची हळू हळू खात्री झाली कीं, याला ज्ञानाचा गर्व नाहीं, व एकदम योग्यतेस चढल्याचाही ताठा याच्या आंगीं बिलकूल नाहीं. यादवरावांच्या सांगण्याप्रमाणें व्याख्यानकारांच्या होईल तितकें उपयोगीं पडण्याचा माझा प्रयत्न चालू असे. परंतु ते मला इतके अडाणी समजत कीं, त्यांच्या एखाद्या यंत्रास ते मला हातही लावूं देत नसत. त्यांचें व्याख्यान चालू असतां मला त्यांच्या जवळ नुसतें खांबासारखें उभें राहावें लागे; व त्यांचें व्याख्यान संपतांना ते मला टोमणा मारून माझा नेहेमीं पाणउतारा करीत; तो असा. ते ह्मणत " गृहस्थहो, आतां यापुढें जें कांहीं तुमच्या दृष्टीस पडावयाचें आहे, त्यापेक्षां माझें व्याख्यान जास्त महत्त्वाचें आहे, हें तुमच्या लक्षांत आलें असेल, हें मी जाणतों. तरी तुह्मांला 'जनोबांचा तमाशा' पहावयाचा आहे, ह्मणून मी आपलें व्याख्यान आतां संपवितों."

एके दिवशीं घोड्याचें गवत संपल्यामुळें व्याख्यानकारांनीं खिशांतून पटकन एक अधेली माझ्या हातावर टाकली, व गड्याकडून गवत आणवा, ह्मणून मला सांगितलें. माझ्या हातांत दुसरी एक वस्तु असल्यामुळें ती अधेली त्यावर घांसली गेली, व मी पाहातों तों तिचा पांढरा रंग कांहीं नाहींसा होऊन, पिंवळसर दिसूं लागला. पुढें विचार करतां माझ्या लक्षांत आलें कीं, व्याख्यानकारांजवळ बिनफांशाच्या अशा एक दोन सोन्याच्या पुतळ्या होत्या, व परवां कांहीं चमत्कार मंडळीस करून दाखवितांना त्यांनीं पटकन त्या पुतळीवर पाऱ्यानें पांढरा रंग चढविला होता. मीं लागलीच ती पुतळी त्यांची परत देऊन खरी अधेली घेतली, व त्यांनीं विचारल्यावरून रंग कसा चढविला होता, ती कृति त्यांस बरोबर सांगितली. त्यावरून माझ्या प्रामाणिकपणाबद्दल व बुद्धिसामर्थ्याबद्दल त्यांची खात्री झाली.

दुसरे दिवशीं व्याख्यान संपवितांना त्यांनीं मला टोमणा मारिला नाहीं. तिसरे वेळीं त्यांनीं आपलीं यंत्रें वगैरे नीट आटोपून ठेवण्याचें काम मजवर सोंपविलें. अशा तऱ्हेनें हळू हळू ते मजशीं मोकळ्या मनानें व प्रेमभावानें वागूं लागले. ते स्वभावतः फार आळशी होते. तरी मजबद्दल त्यांची पुरी खात्री नसल्यामुळें ते आपल्या वस्तूंस फार जपत असत, व कपड्यालत्त्यांस सुद्धां मला हात लावूं देत नसत. तरी आमच्या प्रवासांत त्यांच्या १०।१२ जिनसा हरवल्या; व त्या कदाचित् मींच लांबविल्या असतील असा त्यांचा ग्रह होता. परंतु माझ्या प्रामाणिकपणाबद्दल त्यांची खात्री झाल्यावर माझ्याबद्दल पूर्वी व्यर्थ संशय बाळगल्याबद्दल त्यांना फार वाईट वाटलें. पुढें त्यांनीं एकंदर व्यवस्था मजवर सोंपविल्यामुळें मी दक्षतेनें काम करूं लागलों. त्यांची एकही जिन्नस गैरविल्हेस लागली नाहीं. मी त्यांच्या वस्तूंस इतका जपूं लागलों, याबद्दल त्यांनीं माझे फार फार आभार मानले. ते मजशीं सभ्यतेनें वागूं लागले, व व्याख्यान-संबंधी माझ्या शंका लक्षपूर्वक घरीं आल्यावर दूर करीत.

पुढें त्यांनीं आपलें चिटणिशीचें कामही मलाच करावयास सांगितलें. त्यांचें अक्षर अतिशय वाईट होतें. वाईट—ह्मणजे इतकें वाईट होतें कीं, "आप लिखे खुदा बाचे!" स्वतःचें स्वतः-लाही वाचण्याची मारामार पडे. त्यांच्या उलट्या बाऽहुल्या अ-सल्यामुळें कागद अगदीं कपाळाशीं न्यावा लागे, व ते विचार करीत बसले ह्मणजे नाक व तोंड इतकें वाईट करीत कीं, श्रो-तेमंडळी हांसल्याखेरीज राहात नसे. लिहिण्याचें काम मजवर टाकल्यामुळें, माझें अक्षरही अनायासें चांगलें झालें, व नामांत-ऱ्हेच्या ग्रंथांतून ज्या टीपा वगैरेंवर ते खुणा करीत, त्या उत-रून घेण्याचें काम मजकडे असल्यामुळें, अनेक विषयांची मा-

हिती मला सहज होऊं लागली. त्यामुळें पहिल्यानें त्यांनीं मला वाईट तऱ्हेनें वागविलें, त्याबद्दल नुकसान या तऱ्हेनें भरून आलें असें मी समजलों.

भाग दाहावा.

ज्ञानसंपादन हें संरक्षणास, व धन आणि लौकिक वाढविण्यास उपयोगीं पडतें.

लेखन व वाचन यांचें खरें महत्त्व आतां मला कळूं लागलें. नानाविध ज्ञानभांडारें पाहण्याची मला गोडी लागली. आणि अतिशयित ज्ञानप्राप्तीची मला हांव लागली. मध्यरात्र उलटेपर्यंत वाचीत बसण्याची मला संवय लागली, व व्याख्यानकारांचीं सर्व पुस्तकें आतां माझ्या ताब्यांत असल्यामुळें हें वाचूं कीं तें वाचूं असें मला झालें.

हा माझा व्यासंग पाहून आमच्या नवीन यजमानास संतोष झाला, व एखादी गोष्ट अडल्यास ती अमक्या पुस्तकांत आढळेल असें ते सांगूं लागले, व माझ्या शंकांचें निरसन करूं लागले. ते शास्त्रीय विषयांत प्रवीण असल्यामुळें मला फार आवडूं लागले. परंतु ही स्थिति फार दिवस टिकली नाहीं. हळू हळू मीं कांहीं शंका विचारल्यास त्यांचें निरसन करणें त्यांनीं सोडून दिलें. पुस्तकें चोळवटून खराब होतात, म्हणून ते मला त्यांस हात लावूं देईनात. आणि कांहीं तरी कारणानें ते मजवर वारंवार रागावत. त्यांच्या वागणुकींत असा फरक कशानें पडला याचें कारण बरेच दिवसपर्यंत मला उमगेना. पण मग मला कळलें कीं, पूर्वी मी अगदीं अज्ञाणी म्हणून जे माझा तिरस्कार करीत असत, तेच आतां माझें बुद्धिसामर्थ्य व ज्ञानार्जन हीं पाहून माझा द्वेष करूं लागले. मीं दिवसेंदिवस सर्व अभिमान सोडून नम्रपणें वागत

असतां त्यांच्यांत इतका विलक्षण फरक कां पडला याचें मला फार आश्चर्य वाटे. माझें नम्रतेचें वागणें कपटबुद्धीनें होत आहे, व मी त्यांपेक्षां श्रेष्ठ होण्याच्या प्रयत्नांत आहें असें त्यांस वाटूं लागलें. परंतु माझ्या मनांत तशी कल्पना सुद्धां नव्हती. एके दिवशीं ते मला ह्मणाले, जनोबा, इतका अभ्यास कशाला करतां ? तुह्मांला जरी आंतून यादवरावांची फूस आहे, व तुह्मीं जरी असें कारस्थान चालविलें आहे, तरी एवढें ध्यानांत ठेवा कीं विद्येच्या कामांत माझ्या पुढें तुमचें तेज बिलकूल् पडावयाचें नाहीं.

तें ऐकून माझ्या देहांत एकदम उजेड पडला. त्यांच्या आंगीं जर विचारशक्ति असती, तर माझ्या चेहेऱ्यावरूनच मी निरपराधी आहें, असें त्यांनीं ताडलें असतें. पण मजबद्दल त्यांचें मत इतकें ठाम झालें होतें कीं, त्यांच्या पुढें माझ्या भगीरथ प्रयत्नांचा कांहीं उपयोग नव्हता. त्यांचें समाधान होण्याकरतां मीं त्यांचीं पुस्तकें, व हस्तलिखित टांचणें हीं परत दिलीं, व त्यांच्या व्याख्यानास जाईनासा झालों. अशा तऱ्हेनें मजबद्दलचा निरर्थक संशय दूर करण्याचा मीं प्रयत्न केला. पुढें अशी तजवीज ठेवली कीं, ते जो विषय पाहत असतील तो विषय सुद्धां इतर पुस्तकांतून आपण पहावयाचा नाहीं. असें करण्याचा हेतु ह्मणून इतकाच कीं, त्या विषयांत वरचढ करून दाखविण्याच्या प्रयत्नांत मी आहें, असें अपयशाचें खापर माझ्या डोक्यावर न फुटावें. माझ्या धन्याचा हा मत्सरभाव एक अंशीं माझ्या हितास कारणच झाला. अनेक विषयांवर माझें वाचन झालें होतें, त्यामुळें प्रत्येक विषयाची कांहीं ना कांहीं तरी माहिती मला झाली होती. परंतु एकाही विषयांत प्रावीण्य मिळविलें नव्हतें. एके दिवशीं एक ओळखीचा उत्तम कारागीर लोहार भेटला. त्यास मीं ह्मटलें, कायरे, तूं इतका हुशार आहेस, तर सोनारकाम व लोहारकाम हीं

दोन्ही तूं कां करीत नाहींस ? त्यावर त्यानें उत्तर दिलें, "महाराज, 'एक धड ना भाराभर चिंध्या' असा धंदा कशाला हवा." हें त्याचें उपदेशाचें वाक्य ऐकून कोणत्या तरी एका विषयांत हातखंडा काम करावयाचें, असा मीं निश्चय केला.

झालें. त्या वेळेपासून विद्याव्यासंगाची आमची व आमच्या धन्याची दिशा अगदीं बदलली. पुढें आमच्या यजमानास वाटलें कीं, इकडे तिकडे खेडोपाडीं हिंडण्यापेक्षां राजधानींत जाऊन पैसे मिळवावे. तिकडे जातांना वाटेवर एका खेडेगांवीं आह्मी उतरलों. अलीकडे 'विद्याव्यासंग' याच संबंधानें मात्र त्यांची आमची फारकत झाली होती. त्यामुळें टिपणें वगैरे ते स्वतःच लिहून ठेवीत. परंतु व्याख्यान देतांना 'आप लिखे खुदा बाचे' अशी त्यांची अवस्था झाली. त्यांनीं आपलें व्याख्यानही बरेंच लांबविलें, व पुढें निव्वळ भाकडकथा चालविल्या; तेव्हां श्रोतेमंडळी अगदीं त्रासून गेली. इतक्यांत मध्यें व्याख्यानकारांचा कांहीं प्रश्नाबद्दल विचार चालू झाला. तेव्हां त्यांच्या चेहेऱ्याकडे पाहून मंडळीस त्यांचा अगदीं वीट आला. तरी शेवटीं त्यांनीं व्याख्यान संपवितांना माझा पाणउतारा करावयाचा तो केला. तेव्हां मंडळी ह्मणाली, महाराज, या दळणापेक्षां त्यांत कांहींतरी मनोरंजन होईल, करितां आपलें व्याख्यान आटोपा. लोकांचा असा ग्रह पाहून त्यांनीं तेथें माझा फार अपमान केला. तरी पण मी अगदीं गुपचीप बसल्यामुळें तेथें त्यांची हुर्यो होऊन लोक माझी स्तुति करूं लागले.

त्यामुळें माझ्या धन्यास राग येऊन, चला आपलें प्रदर्शन लौकर आटोपा, असें ते मला ह्मणाले. परंतु प्रदर्शन चालू असतां एक दोघांनीं मोठ्या जिज्ञासेनें त्यांतील कांहीं पाहण्यास घेतले, तेव्हां मला आटोपतें घेतां येईना.

एका तरुण गृहस्थानें एका यंत्राबद्दल मला बरेच रुपये दिले, परंतु मीं वाजवी रक्कम घेऊन बाकीची त्यास परत दिली. तेव्हां तो ह्मणाला कांहीं हरकत नाहीं. तुह्मांस राजधानीस जावयाचें आहे. माझे वडील तेथें आहेत. हा त्यांचा पत्ता. तुह्मी तेथें पोहोंचल्यावर मी त्यांस पत्र पाठवीन, व मग तेथें तुमचा विशेष फायदा होईल.

मी राजधानीस पोहोंचण्यापूर्वी त्या तरुण गृहस्थानें आपल्या वडिलांस पत्र पाठविलें होतें. मी त्यांना जाऊन भेटलों. त्यांनीं उद्यां संध्याकाळीं तुमच्या प्रदर्शनाचें सर्व साहित्य घेऊन येथें या ह्मणून सांगितलें. त्यांनीं तेथें प्रदर्शन पाहाण्यास पुष्कळ मंडळी जमविली. सर्व दिवाणखाना अगदीं गजबजून गेला होता. प्रदर्शन झाल्यावर वेगळाल्या यंत्रांबद्दल पुष्कळ लोकांनीं नानातऱ्हेची माहिती मला विचारली. परंतु ते वृद्ध गृहस्थ तोफा ओतण्याच्या कामाबद्दल एका बड्या सरदाराशीं कांहीं भाषण करीत होते.

सरदार त्या वृद्ध गृहस्थास ह्मणाला, चिंतामणराव, पितळेची तोफ ओतण्यास जस्त किती मिसळावें लागतें तें तुह्मांस आठवतें काय ? ते दोघे जेव्हां विचारांत पडले तेव्हां मीं नक्की प्रमाण सांगितलें. त्या उत्तरानें सरदार खूष झाले, व त्या वृद्ध गृहस्थाच्या विनंतीवरून त्यांनीं माझीं सर्व यंत्रें लक्षपूर्वक पाहिलीं व कित्येक नमुने कसे तयार करतात वगैरे विचारिलें. माझ्या त्या उत्तरानें सरदार खूष होऊन त्यांनीं मला माझें पूर्ववृत्त विचा-
व मद्रासेकडे आमच्या संस्थानांत एक अनाथ मुलांकरितां
आहे तींत धंदेशिक्षण चालतें, तेथें मुख्य अधिका-
५०० रुपयांची आहे व दुय्यम अधिकाऱ्याची
आहे. करितां त्या शाळेवर दुय्यम अधिकाऱ्याचें

काम तुह्मी पतकराल तर तुह्मांस दरमहा १०० रुपये देऊं असें त्यांनीं मला सांगितलें. परंतु तुह्मांस हुकूम देण्यापूर्वी तुमच्या वर्तणुकीबद्दल वगैरे रघुनाथराव व यादवराव यांचेकडून पत्रें आलीं पाहिजेत. त्या दोघांचींही पत्रें सरदारास परभारें आलीं, त्यावरून त्यांस आनंद होऊन त्यांनीं माझी वर सांगितलेल्या ठिकाणीं नेमणूक केली, व रघुनाथरावाकडचें पत्र माझ्या स्वाधीन करून ते ह्मणाले, हें तुमच्याच जवळ असूं द्या. तुह्मी कोठेंही असलां, व कशाही स्थितींत असलां, तरी हें पत्र पाह-तांच पाहाणारा सर्वपरी तुह्मांला अनुकूल होईल. मग मीं त्या सरदाराचा निरोप घेतला. चिंतामणरावांचे फार आभार मानले. त्यांच्या चिरंजीवांस पत्र पाठविलें, व यादवराव आणि रघुनाथराव यांसही पत्रें लिहिलीं. मग व्याख्यानकारांचा व आमचा हिशोब पुरा केला. ही नवीन जागा त्यांना मिळाली नाहीं याचें त्यांस फार वाईट वाटलें. तेव्हां मीं त्यांना सांगितलें कीं, त्या कामीं व-स्तुतः योजना तुमचीच व्हावयाची, परंतु तुमचें वय पडलें जास्त, व त्यांना तर इसम २५ विशीच्या आंत हवा होता. आणि माझें वय कायतें १९ वर्षांचें, ह्मणून मला हा लाभ प्राप्त झाला. हें भाषण व्याख्यानकारांस फार आवडलें. अशा तऱ्हेनें सुखास-माधानांत मीं त्यांचा निरोप घेतला.

भाग अकरावा.

कर्मासारखी गति !

मी नवीन संस्थानाकडे जाण्यापूर्वी रघुनाथरावांनीं मला पत्र पाठवून कळविलें कीं, ज्या खाणीच्या नफ्यांतून मी दरसाल तु-ह्मांस १२५ रुपये पाठवीत होतों, ती खाण फारच फायद्याची बहु झाली आहे. करतां यापुढें तुह्मांस दरसाल १५० रुपये

मिळतील. परंतु तुह्मी चांगल्या हुद्द्यावर व दूरदेशीं जात आहां, तेव्हां माझ्या मनांत असें येतें कीं, आतां यापुढें ती रकम तुमच्याकडे न पाठवितां, तुमच्याच नांवावर येथें एका दुसऱ्या धंद्यांत घालावी. शिवाय त्या संस्थानाकडे जातांना मध्यें रामचंद्रपंत यांच्या गांवीं तुह्मीं जावें; ह्मणजे आणखी आवश्यक अशीं यंत्रें तुह्मांस तेथें त्यांचेकडून मिळतील. तीं यंत्रें तुह्मांस देण्याची तजवीज मीं इकडून पत्र पाठवून परभारें केली आहे.

रामचंद्रपंतांकडे जातों तों त्यांनीं आधींच मजकरतां यंत्रांची पेटी भरून ठेविली होती. त्यांत पृथ्वीचा गोल; कांहीं कांचेच्या नळ्या, हवा काढून घेण्याचे भाते, एक लहानसें वाद्य, बर्फ करण्याचें यंत्र, व आणखी कांहीं यंत्रें भरून ठेविलीं होतीं. शिवाय दुसऱ्या पेटींत एक दोन विमानें, तारायंत्र, व सिद्धांतांच्या आकृति ह्या होत्या. ही सर्व सिद्धता रघुनाथरावांच्या सांगण्यावरून मीं करून ठेविली आहे, असें त्यांनीं मला सांगितलें.

नंतर एके दिवशीं एक मोठी गोष्ट घडली; ती अशी कीं, मी रस्त्यानें जात असतां, एके ठिकाणीं फारच गर्दी होती, ह्मणून सावकाश बाजूनें चाललों होतों. तों पळत पळत एक फेरीवाला आला, व त्यानें गुंडाळलेला अमळ दमट असा एक जाहिरातीचा कागद माझ्या हातांत दिला. व तो ह्मणाला, सोमवार ता० १७ रोजीं केसोबा यांस फांशीं दिलें, त्या वेळीं मरतेसमयींचा हा त्यांचा वृत्तांत आहे. असें बोलत बोलत तो जाहिराती वांटीत चालला.

केसोबा हें नांव ऐकतांच मीं दचकलों, व पटकन तेथेंच उभा राहिलों. त्या कागदांत फांशीं चढवितांना तो जें बोलला तें सर्व लिहिलें होतें. केसोबा हा माझा फार जुना शत्रु होता. त्यानें जन्मापासून आपली सर्व हकीकत सांगितली, व

त्यांत असेंही बोलून दाखविलें कीं, खाणीच्या कारखान्यांत असतां जनु लंगडा या नांवाच्या गरीब बिचाऱ्या मुलाचा खून मीं करणार होतों, परंतु सुदैवानें तो त्याच रात्रीं कसा नाहींसा झाला कोण जाणे ? पुढें माझें तें दुष्ट कृत्य व चोरीचीं इतर वाईट कृत्यें धन्याच्या नजरेस आल्यावरून त्यांनीं मला हांकून दिलें. नंतर या राजधानींत मी कोळशाच्या खाणींत कामावर राहिलों. परंतु तेथल्या धन्यानें माझ्या कांहीं अपराधावरून मला कामावरून काढून टाकलें. नंतर मी जहाजांतला माल चोरूं लागलों. व तो विकून जे पैसे मिळतील त्यांची दारू विकत घेऊन ती पिण्याचा क्रम सुरू केला. तेथें पिण्यांत एके दिवशीं कांहीं कारणावरून एका बाईस मीं इतकें बेदम मारिलें कीं ती मरण पावली. पुढें चौकशींत खरी गोष्ट बाहेर पडली. ती ही कीं, आम्हां दोघांचा कांहीं अंतस्थ कारणावरून बेबनाव झाला होता, त्याजबद्दलचा सूड मीं अशा तऱ्हेनें उगविला, व त्या सर्व दुष्कर्मांचें प्रायश्चित्त मीं आज आतां भोगणार आहें. तेव्हां माझ्या ह्या चरित्रावरून लोकांनीं चांगला बोध घ्यावा, असें त्या गुंडाळलेल्या कागदांत लिहिलें होतें.

तो मजकूर वाचतांना माझ्या आंगास कांपरें सुटलें, व त्या दुष्टाचा असा परिणाम झाला, याचेंही मला वाईट वाटलें. पोरवयांत त्या दुष्टाचा समागम फार दिवस मला झाला नाहीं, ह्मणून मीं ईश्वराचे पुष्कळ आभार मानून प्रार्थना केली, व ज्या थोर महात्म्यांनीं, (ह्मणजे माझे पूर्वीचे यजमान रघुनाथराव यांनीं) मला दुर्गुण व दरिद्रावस्था यांतून सोडवून सद्गुणास व योग्यतेस चढविलें, त्यांचें उतराई कसें व्हावें. हे विचार माझ्या मनांत घोळूं लागले.

भाग बारावा.

राजाला सगळेंच येत असतें का ?

मी मार्च महिन्यांत नवीन संस्थानाकडे जाण्यास निघालों, तो तेथें सुखरूप दाखल झालों. तेथील अनाथ मुलांच्या शाळेचे मुख्य अधिकारी बाळासाहेब या नांवाचे होते. तेथें माझा वेळ फार आनंदांत जात होता. तेथील अधिकारी अमळ तामसी असत, परंतु त्यांच्या आंगीं भूतदया फार होती. हळू हळू तेथील सर्व विद्यार्थ्यांस माझा लळा लागला, व मलाही ते आवडूं लागले. बाळासाहेबांचें ह्मणणें मीं कधींही मोडलें नाहीं, व त्यांना न रुचे अशीही गोष्ट मीं कधीं केली नाहीं. यामुळें त्यांची मजवर मोठी मेहेरबानी होती. ते वारंवार ह्मणत कीं, आह्मांस असे चांगले मदतनीस आजपर्यंत एकही मिळाले नाहींत. शाळें-तलें काम संपल्यावर मीं कधीं कधीं गमतीनें मुलांस कांहीं चमत्कारिक रसायनप्रयोग करून दाखवीत असें.

अशा आनंददायक स्थितींत सुमारें तीन वर्षें काढल्यावर एके दिवशीं बाळासाहेबांनीं मला बोलावणें पाठविलें, आणि विचारलें कीं, शेजारच्या संस्थानांत नवाबसाहेबांच्या मुलांस पूर्वी वामनराव शिकवीत असत, त्यांचें नांव ऐकून तरी तुह्मांला ठाऊक आहे का ? त्यावर मीं सांगितलें कीं, त्यांचें नांव ऐकून मला माहीत आहे. ते नबाबाच्या मुलांस पदार्थविज्ञानशास्त्र शिकवीत असत. त्यांनीं तेथें कोणकोणते चमत्कारिक प्रयोग करून दाखविले, तेही मला ठाऊक आहेत. परंतु पुढें कांहीं त्यांचें खाजगी घर-काम निघालें, ह्मणून ते तेथली नोकरी सोडून गेले.

बाळासाहेब—बरें पण मला नबाबसाहेबांकडून असें पत्र आलें आहे कीं, तुमच्या खात्रीचा, बहुश्रुत, हुषार व मजेचे र-सायनप्रयोग करून दाखविणारा असा एखादा इसम असल्यास

आह्मांस त्याची जरूर आहे. तेव्हां तुह्मी तिकडे जाण्याची तयारी करावी, अशी माझी इच्छा आहे.

मीं लागलीच नबाबसाहेबांच्या संस्थानांत जाण्याची तयारी केली. पूर्वी वामनरावांनीं कोणते प्रयोग त्यांस करून दाखविले होते ते मला ठाऊक होते. ह्मणून मीं नव्या नव्या प्रयोगांची सिद्धता करण्याचें साहित्य जवळ घेतलें. बाळासाहेबांच्या सांगण्यावरून कथलाच्या खाणीचे नमुने, विमानें, तारायंत्राचें साहित्य, बर्फ करण्याचें यंत्र, वगैरे सामान बरोबर घेतलें, आणि तेथले आणखी दोन हुषार विद्यार्थी बरोबर घेऊन आह्मी त्रिवर्ग निघालों. नबाबसाहेबांच्या राज्यांत पाय ठेवतांच पहिल्यानें आह्मांस तीन शिपाई भेटले. ते मुद्दाम आह्मांस नेण्याकरतांच तेथें आले होते. दरबारांत पोहोंचल्यावर तेथल्या मंडळींनीं आमचें फार चांगलें स्वागत केलें. रीतीप्रमाणें मुजरे वगैरे झाल्यावर मी आपल्या जागेवर बसलों, व सभोंवतालचा भव्य देखावा पाहूं लागलों तेव्हां माझे डोळे दिपून गेले. कांहीं वेळानें दुभाष्यानें मला सांगितलें कीं, तुह्मांला शास्त्रीय विषयांत जे कांहीं मनोरंजक प्रकार करून दाखवितां येत असतील, ते येथें दरबारांत करून दाखवावे.

मीं आपलीं यंत्रें सर्व बाहेर काढलीं व प्रथम बर्फ तयार करण्याचें यंत्र हातीं घेतलें. परंतु नबाबसाहेबांची नजर रेशमी विमानाकडे गेली व त्या पिशवीची मजा काय असते ती आधीं करून दाखवा असें ते मला ह्मणाले. मीं त्यांस सांगितलें कीं हींत एक प्रकारची हवा भरावी लागते व मग हें विमान आपोआप आपल्या वाड्याच्या गच्चीपेक्षांही उंच जाईल. इतकी माहिती सांगितल्यावर ताबडतोब हाच प्रयोग आधीं करून दाखवा ह्मणून नबाबसाहेबांनीं मला हुकूम केला. परंतु तो प्रयोग

करून दाखविण्याची सिद्धता या वेळीं झाली नाहीं असें मीं सांगितल्यावरून साहेबांची तब्यत गरम झाली, व ते ह्मणाले तुह्मी जो प्रयोग आतां करून दाखविणार तो पाहण्याची आमची इच्छा नाहीं. मी ह्मणालों हुजूर, मी जो इतका लांबवर आलों, तो आपल्या इच्छेविरुद्ध वागण्यासाठीं नव्हे, तर आपल्याला आनंदित करण्याकरतां. असें असतां मेहेरबानांस आवडणार नाहीं असा खेळ मी आपल्यास कसा दाखवीन? तेव्हां मीं जें प्रदर्शन करणार तें आपल्या पसंतीचेंच करीन. इतकें ह्मटल्यावर साहेब खुष झाले, व राग शांत करून ह्मणाले, बरें तर, तें विमान उद्यां उडवून दाखवा व आतां जें चाललें आहे तें चालूं द्या.

मीं बर्फ करण्याचें यंत्र दाखवून त्याजबद्दल माहिती सांगितली, तों नबाबसाहेब पाणी उंच उडविण्याच्या यंत्राबद्दल कांहीं गोष्टी सांगूं लागले, व पुढें त्यांनीं यांत्रिक विद्येच्या माहितीबद्दल अशा गप्पा सांगितल्या कीं, प्रथम माझ्या मनांत जी त्यांजबद्दल पूज्यबुद्धि उत्पन्न झाली होती, ती नाहींशी झाली. दरबारी मंडळीस स्वतःचा मोठेपणा दाखविण्यासाठीं ते माझ्याशीं वादविवाद करीत. परंतु त्या वादविवादांत ते हरले ह्मणजे ह्मणत कीं, हा काय नुसता गारोडी आहे, कांहीं तरी अमळ मौज करून दाखवितो झालें. पुढें त्यांनीं आपला पक्ष सबळ दाखविण्यासाठीं एक वाद्य काढलें, परंतु मीं त्याहीपेक्षां वरचढ असें मजजवळचें वाद्य काढलें. तें ऐकून त्यांनीं तें लागलीच मजजवळ मागितलें, व मीं तें त्यांस दिल्यावर मुलाला जशी एखादी खेळाची वस्तू दिल्यानें आनंद होतो, तसा त्यांला आनंद झाला.

भाग तेरावा.

"अव्यवस्थितचित्तानां प्रसादोपि...."

दुसरे दिवशीं नबाबसाहेब मोठ्या तंबूंत बसले, व मुख्य

मुख्य दरबारी लोक त्यांच्या दोन्ही बाजूंस बसले. नबाबांचे चिरंजीव त्यांच्या उजव्या हातास बसले होते. त्यांचें लक्ष एकसारखें मजकडे होतें. पुढें नबाबसाहेबांनीं इशारा केल्याबरोबर मीं विमानाच्या खालच्या दोऱ्या कापून टाकल्या, तों तें मोठ्या डौलानें पण जलद वर जाऊं लागलें. तो चमत्कार पाहून सर्व मंडळीस इतकें आश्चर्य वाटलें कीं, त्यांचा आनंद त्यांच्या पोटांत मावेना! कोणी ओरडूं लागले, कोणी टाळ्या वाजवूं लागले, कोणी त्या आनंदांत उड्या मारल्या! फार तर काय, पण खुद्द नबाबसाहेब सुद्धां टिऱ्या पिटूं लागले!

तें विमान दिसेनासें झाल्यावर सर्व मंडळी आपापल्या जागीं बसली. मग त्या अद्भुत चमत्काराबद्दल नबाबसाहेबांनीं आपल्या खजीनदारांस २०० शें होन मला बक्षीस देण्याविषयीं सांगितलें. मी जेव्हां नबाबांजवळ मुजरा करण्यास जाऊं लागलों, तेव्हां दरबारची बरीच मोठी मंडळी साहेबांवर नाखूष झालेली दिसली. त्यांस वाटलें कीं क्षुल्लक चमत्काराकरतां बक्षीस २०० शें होन ह्मणजे निवळ लूट होय!! ही गोष्ट साहेबांच्या नजरेस येतांच मंडळीस जास्त वाईट वाटण्याकरतां त्यांनीं आपल्या हातांतली हिऱ्याची आंगठी मला बक्षीस दिली! मी तेथून परत जातों तों मला पुन्हां बोलावलें, व चिरंजीव अबदुलअल्ली यांस यांत्रिकविद्या शिकवा ह्मणून नबाबसाहेबांनीं मला सांगितलें.

हा हुकूम ऐकून मला संतोष झाला. कारण अबदुलअल्ली हे बापासारखे हट्टी व तब्यतशीर नसून चलाख बुद्धीचे व गुणग्राही होते. पूर्वी त्यांस थोडेंसें शिक्षण वामनरावांपासून मिळालें होतें. त्यामुळें त्यांच्या आंगीं विशेष सभ्यता आली होती. त्यांनीं आपले तंबू वगैरे उत्तम सामान मला दाखविलें, व शेवटीं ते ह्मणाले कीं, तुमच्यासारख्या ब्राह्मणांचें सुशिक्षण आह्मांसारख्या मुसलमां-

नांस फार उपयोगीं पडतें. दुसऱ्या एका गोष्टीनें त्या राजबिंड्याबद्दल माझा अनुकूल ग्रह झाला. कारण नजरनजराण्याच्या बहुमोल किंमतीची ते योग्यता मानीत नसत, परंतु, देतांना अगर घेतांना देणाऱ्याच्या अगर घेणाऱ्याच्या भावनांची किंमत ते समजत. पैशापेक्षां ते वर्तणुकीला मान अधिक देत. माझ्या थोरपणाचें वर्णन त्यांनीं गोड भाषणानें करून थोरपणाच्या वर्तणुकीनें आपली कृतज्ञता प्रदर्शित करावी. नबाबसाहेबांनीं खजीनदारांस जरी मला ५० रुपये रोज द्यावयास सांगितले होते, तरी मधून मधून क्षुल्लक कारणांवरून ते माझा उपमर्द करीत, तो मला सहन होत नसे. त्यांचे चिरंजीव, मीं जरी कांहीं शिकविलें कीं लागलीच उतराई होण्याबद्दल पैसे झोंकून देत नसत, तर ह्या शिक्षणाबद्दल आमचे गुरु अमके, अशी माझी योग्यता ठेवीत आणि खरें पाहिलें असतां मित्र व चाकर हे पैशापेक्षां थोरांच्या तोंडच्या प्रशंसेनें विशेष वश होत असतात.

प्रत्येक दिवशीं बापलेकांची तुलना करण्याचें कारण मला कांहीं तरी उत्पन्न होत असे, व माझ्या शिष्यावरचा माझा लोभ दिवसेंदिवस वाढत चालला. असा राजबिंडा माझा शिष्य आहे याचें मला आश्चर्य वाटे आणि आनंद होई. जेथें हल्लीं सुधारणेचा झेंडा मिरवतो आहे अशा राज्यांत शास्त्र व भाषा यांचा एखाद्यानें फार अभ्यास केला तर बक्षिस काय मिळायचें ? कागदाच्या सुरळीवर एक उपपद ! परंतु नबाबसाहेबांच्या राज्यांत सोन्याखेरीज दुसरें बक्षिस नाहीं, हें कळविण्यास मात्र मला अत्यानंद वाटतो.

एके दिवशीं मी त्यांच्या चिरंजीवास शिकवीत असतां नबाब तेथें आले, व ह्मणाले, ह्या प्रयोगांत काय महत्त्व आहे ? हें तर मागेंच एका मुनशीनें आह्मांला दाखविलें होतें, व आमच्या मुलास त्याची समजही त्यांनीं करून दिली होती.

हें ऐकून नबाबांचे पुत्र ह्मणाले, साहेब, मागें मला कांहींच कळलें नाहीं, परंतु आतां यांनीं हा प्रयोग फारच सुरेख रीतीनें समजावून दिला आहे. हें भाषण ऐकून मला अमळ बरें वाटलें. पुढें कथिलाच्या खाणीच्या नमुन्यांकडे बोट दाखवून नबाब ह्मणाले, हें काय आहे? हें तुह्मीं आह्मांला दाखविलें नाहीं? हें पाहाणें आपल्यास आवडणार नाहीं असें समजून मीं कांहीं दाखविलें नाहीं, असें मीं त्यांस उत्तर दिलें. तों लागलीच आधीं ही सर्व मौज आह्मांस दाखवा ह्मणून त्यांनीं सांगितलें. मीं लागलीच तें प्रदर्शन करून दाखविलें त्यामुळें साहेब फार खूष झाले, त्यांनीं प्रत्येक यंत्र तपासून पाहिलें, व सांगितलें कीं, आमच्या येथेंही कथलाच्या खाणी आहेत. परंतु त्यांजपासून चांगली किफायत होत नाहीं. कारण तेथें कांहीं तरी लबाडी असावी असें माझें अनुमान आहे.

नंतर हे नमुने तयार करण्याचें कारण काय, व ते माझ्या हातीं काय कारणानें कसे आले, व खाणींतल्या कामाची मला माहिती आहे कीं काय, वगैरे अनेक प्रश्न त्यांनीं मला विचारिले. एकंदरींत त्यांनीं पूर्ववृत्त मला विचारण्याची सुरवात केली. तेव्हां मीं सांगितलें कीं, आपण नबाब आहां; मी यत्किंचित् मनुष्य आहें. तशांत माझें पूर्वचरित्र फार लांब आहे. तेव्हां आपण आपला अमोल्य वेळ या क्षुल्लक बाबतींत कां खर्चतां? परंतु त्यांच्या आग्रहानें मीं आपली हकिकत सांगण्यास प्रारंभ केला. खाणींतून माझी सुटका कशी झाली, तें ऐकून नबाबांच्या पुत्रास अगदीं कळवळून आलें. परंतु नबाबसाहेबांस हा गप्पाच्या गृहस्थ आहे, असें वाटूं लागलें. तेव्हां रघुनाथरावांचें चिंतामणरावांस आलेलें पत्र मीं त्यांस दाखविलें. तेव्हां माझ्या प्रामाणिकपणाबद्दल त्यांची खात्री झाली. शेवटीं नबाबांनीं मात्र मला असे

कळविलें कीं, आमच्या येथल्या खाणींतल्या कारखान्यांतले दोष नाहींतसे करून सर्व कारखाना सुरळीत चालवून द्याल तर दरसाल तुह्मांस नोकरीपेक्षां ह्मणजे ६०० रुपयांपेक्षां जास्त वेतन खास देऊं.

या गोष्टीचा विचार करण्यास त्यांनीं मला थोड्या दिवसांची फुरसत दिली. एक वेळ मला असें वाटे कीं, वाहत्या पाण्यांत हात धुऊन घ्यावे. येथें एकदां रगड पैसे मिळविले कीं, जन्माचें कल्याण होईल. परंतु, पुन्हा असेंही मनांत येई कीं, सुखाची भाजीभाकर बरी, पण अशा तब्यतखोर व जुलमी धन्याची तूपसाखर नको. अशा गोंधळांत पडलों असतां या कामीं बाळासाहेबांचें अनुमोदन घ्यावें, असा विचार माझ्या मनांत आला. मीं त्यांस पत्र पाठविलें त्याचें उत्तर आलें कीं, ही संधि तुह्मीं व्यर्थ दवडूं नये. तेव्हां नबाबसाहेबांचें ह्मणणें मीं तत्काळ कबूल केलें.

ह्या सहा आठवड्यांत माझा एकंदर नजरनजराणा व पगार मिळून ५०० शें होन व ५०० रुपये जमले. ही सर्व रक्कम व नबाबसाहेबांनीं दिलेली आंगटी मीं धर्मचंद मारवाडी यांचे जवळ ठेवण्यास दिली; कारण ते मजशीं फार स्नेहभावानें वागत असत. बरोबर बरेच लोक घेऊन मोठ्या दक्षतेनें मीं खाणीचें काम सुधारण्यास सुरवात केली. तें काम मोठ्या श्रमाचें होतें. कारण, तेथें सर्व बेदाद होती. जो तो मालकच. बाकी, वाटेल त्या इसमास काम केलें नाहीं अगर आज्ञा पाळली नाहीं तर हवी ती शिक्षा करण्याचा सगळा अधिकार मला दिला होता. परंतु त्या अधिकाराचा मीं दुरुपयोग केला नाहीं.

अधिकाराच्या जोरावर लोकांकडून जुलमानें काम करून न घेतां, मी मधून मधून त्यांच्याकडे कानाडोळा करीत होतों, व तोच क्रम मला हितावह झाला. हळू हळू मला त्यांची भाषा येऊं लागली. जेथें त्यांचें व माझें मत भिन्न पडे, तेथें सर्वांच्या अ-

नुमतानें जें ठरेल तें करण्यास मी परवानगी देई. यामुळें थोड्याच वेळांत मी सर्वांस प्रिय झालों, व सर्व माझ्या मतानें वागूं लागले. नव्या व जुन्या पद्धतीच्या योगानें जो जास्त नफा होई, त्याचा निम्मा हिस्सा सरकारतिजोरींत भरून निम्मा फायदा मी तेथल्या लोकांस वांटून देऊं लागलों. यामुळें सर्व मंडळी अगदीं माझ्या आधीन झाली, व हळू हळू मी करीन ती पूर्वदिशा असें तेथें झालें.

याप्रमाणें सर्व कारखाना सुरळीत चालू केल्यावर, मीं नबाबसाहेबांकडे एक इसम पाठविला, व त्यांस सुचविलें कीं, आपल्या इच्छेनुरूप खाणीचें काम सुरळीत व व्यवस्थेशीर चालविलें आहे, तर, कोणी तरी खात्रीचा इसम येथें पाठविण्याची तजवीज करावी, ह्मणजे त्यास मी सर्व काम समजून देऊन आपल्या उद्योगास परत जाईन. तो मनुष्य कितीक दिवसांनीं परत आला, व त्यानें सांगितलें कीं, आणखी सूचना होईपर्यंत आपणच सर्व देखरेख करावी. याही गोष्टीस तीन महिने लोटले तरी कांहीं दाद नाहीं, तेव्हां मीं समक्ष जाऊन भेटण्याचा संकल्प केला.

पुढें एका किल्ल्यांत त्यांची माझी भेट झाली. परंतु, माझ्याकडे लक्ष देण्याचा अगर माझ्याशीं बोलण्याचा त्यांचा विचार दिसेना. खाणीबद्दलची गोष्ट त्यांच्या गांवींही नव्हती. कारण एका सरसुभ्यावर स्वारी करून त्याचा सूड घेण्याच्या विचारांत ते अगदीं निमग्न झाले होते. त्यांच्या खजीनदारांनीं मला सांगितलें कीं, तुह्मी परक्या देशांतले असून तुमच्या संबंधानें बराच पैसा निरर्थक खर्च झाला, व ज्याअर्थी आतां लढाईच्या कामास पैशाची फार जरूर आहे, त्याअर्थी तुमच्या व्यापाराच्या क्षुल्लक कामांत सरकार व्यर्थ पैसा खर्चूं इच्छीत नाहीं. अशा तऱ्हेनें माझा अपमान करून, दिलेलें वचन त्यांनीं मोडलें, यावरून अशा जुलमी

व तव्यतखोर नबाबांच्या हाताखालीं जे नेहेमीं नोकरी करतात, त्यांच्या स्थितीबद्दल मी विचार करूं लागलों.

भाग चौदावा.

मनुष्यास तृप्ति नाहीं.

नबाबसाहेबांच्या राज्यांतून जाण्याची मीं तयारी केली. धर्मचंदभाईनीं होन व रुपये संस्थानांत तुह्मांस देण्याची तजवीज करतों, असें, सांगून नबाबसाहेबांनीं दिलेली आंगठी मात्र मला दिली. नबाबांनीं माझ्या जाण्यास हरकत घेतली नाहीं. तरी पण मजबरोबर शिपाई माणूस नसल्यामुळें मला एक दोन दिवस थांबावें लागलें.

मागच्या वेळचे शिपाई परगांवीं कामास गेल्यामुळें मी एकसारखा त्यांची वाट पाहात होतों. नबाबांचे चिरंजीवही गांवीं गेले होते, ते आल्यामुळें त्यांचा निरोप घ्यावयास गेलों, तों ते माझ्या जाण्याचें कारण विचारूं लागले. त्यांची आदबी ठेवून मोठ्या नम्रतेनें मीं माझें जाण्याचें खरें कारण त्यांस सांगितलें. तेव्हां त्यांना काय वाटलें तें त्यांच्या चर्येवरूनच दिसलें. परंतु थोडा वेळ विचार करून ते ह्मणाले, आमचे वडील तूर्त लढाईच्या भानगडींत गुंतले आहेत. तेव्हां माझ्या बोलण्याचा या वेळीं क्वचितच उपयोग होईल. परंतु तुमच्या जवळ लढाईच्या वेळींही उपयोगीं पडण्यासारखी एक वस्तु आहे, करितां आपली इच्छा असल्यास मी त्या यंत्राबद्दल त्यांच्याजवळ गोष्ट काढतों.

त्यांनीं ही सूचना केल्याबरोबर मला तारायंत्राची आठवण झाली. परंतु त्याबद्दल बोलण्याचालण्याचें काम मीं नबाबांच्या मुलावरच सोंपविलें.

आमचें भाषण संपून फार वेळ झाला नाहीं तोंच नबाबसा-

हेबांचें बोलावणें आलें. तारायंत्र पाहाण्यास ते फार उतावीळ झाले. जो मी दोन दिवसांपूर्वी नवाबसाहेब व त्यांचे उमराव यांच्या दृष्टीनें अगदीं लोपून गेलों होतों, तोच मी एकदम कोणी मोठा मनुष्य बनलों. तारायंत्राचें काम माझ्या कल्पनेपेक्षां फारच उत्तम तऱ्हेचें वठलें, व त्यामुळें नवाबसाहेब फार फार खूश झाले.

नवाबसाहेब किती तामसी होते, व घटकेंत अत्यानंद आणि घटकेंत अतिशय कोप हा साहेबांच्या आंगीं कसा जागृत होता, त्याचें एक उदाहरण सांगतों. एके दिवशीं तारायंत्राचें एक हत्यार संवय नसल्यामुळें, मी सांगत होतों त्याप्रमाणें सांवळ्या नांवाच्या चाकरास धरतां येईना. तेव्हां साहेब मजशीं आनंदानें बोलतां बोलतां एकदम रागावले, व त्या चाकरास ह्मणाले, तूं कुचकामाचा नाहींस व त्यांनीं हुकूम केला कीं 'इसका शीर काट डालो'. मग मी मध्यस्ती पडलों. तरी, साहेब ऐकेनात तेव्हां मीं ह्मटलें, हुजूर आपण ह्मणतां तसें करण्यास हरकत नाहीं. परंतु आपल्यास जी मौज दाखवायची तिची सिद्धता होण्यास येथें या चाकराखेरीज दुसरा चाकर नाहीं, तेव्हां आपण मौज कशी पाहाणार ? तेव्हां बरें, सध्या आह्मी त्यास फांशीं देत नाहीं, असें ते ह्मणाले. पुढें त्या चाकराच्याच मदतीनें सर्व काम सुरळीत चाललें, व तारायंत्रानें इकडून तिकडे निरोप जाऊं लागला, तेव्हां साहेब फारच खूष झाले, व मीं 'सांवळ्यास जीवदान द्या' असें ह्मटल्यावर मोठ्या नाखुषीनें त्यांनीं माझें ह्मणणें मान्य केलें.

साहेब मोठ्या आनंदांत असल्यामुळें त्यांनीं मला ५०० होन बक्षीस दिले, व मेहेरबानी करून तेवढें तारायंत्र आह्मांस द्या असें ह्मणाले. तेव्हां मीं तें लागलीच त्यास नजर केलें. यामुळें साहेब विशेष खूष झाले, व 'काय हवें तें मागा' असें ह्मणाले त्या वेळीं खरोखर मीं एखादी लहानशी जहागीर मागितली असती. तरी मला मिळती; परंतु त्या क्षणिक शब्दांवर भरंवसा

ठेवणें चांगलें नाहीं असें समजून 'मला गोवळकोंड्याच्या हि-ऱ्याच्या खाणी पहाण्याची परवानगी मिळावी' ह्मणून मीं ह्मटलें. तों हो ना करतां मोठ्या मिनतवारीनें एकदांची परवानगी मिळाली. लागलीच मी रुपये व होन उमीचंदभाईच्या स्वाधीन केले, आणि माणिकलालभाईचें मित्रत्व संपादन करून त्यांच्या बरोबर गोवळकोंड्यास जाण्यास निघालों. माणिकलालभाई हे हि-ऱ्यांचा व्यापार करीत असत. गोवळकोंड्याच्या खाणी पाहातांच माझे डोळे दिपून गेले. तेथली हकीकत तूर्त न सांगतां माझी गोष्ट मी सांगतों. माणिकलालभाईस त्या शहरीं अनेक कामें असल्यामुळें त्यांचा पाय तेथून निघेना. आतां संस्थानांत परत जाण्याची इच्छा मला झाली. माझा तेथला पगार चालू होताच. त्या रकमेचें मला कांहीं कारण नसल्यामुळें ती तेथेंच एका पेढीवर ठेवण्याची मीं तजवीज केली होती. या वेळीं माझी रकम इतकी मोठी झाली होती कीं, ती सर्व जर मीं व्याजीं लावली, तर दरमहा ती शेंकडा ८४ व्याजानें ५ वर्षांत दुप्पट होईल व जन्मपर्यंत एखाद्या जहागीरदाराप्रमाणें मला वागतां येईल.

असे विचार करीत माणिकलालभाईसह मी पूर्वी सांगितलेल्या किल्ल्याशीं आलों. तों असें कळलें कीं नबाबसाहेबांनीं तो सरसुभा जिंकला व हल्लीं ते आनंदांत आहेत.

पुढें धर्मचंदभाईचा व आमचा हिशेब पुरा करावयास मी लागलों. नबाबसाहेबांनीं दिलेली हिऱ्याची आंगठी कोणत्या प्रकारची आहे हें पहाण्याकरितां मीं ती आधींच घेतली होती. पूर्वी तिची जी किंमत झाली होती त्याच्या तिप्पट किंमतीची ती खास आहे असें गोवळकोंड्यास मला समजलें. उमीचंदभाईस ही सुवार्ता ऐकून फार आनंद झाला. इतक्यांत एक कामगार तेथें आला, व त्यानें, नबाबसाहेबांनीं आपल्यास ताबड-

तोब बोलाविलें आहे, ह्मणून मला सांगितलें. मी खाणींतले कांहीं हिरे तर आणले नसतील ना ? अशी कदाचित् त्यांस शंका येऊन मला बोलावणें झालें असावें असें मला वाटलें, परंतु मन खरी साक्ष देत होतें यामुळें मी निर्भयपणें तिकडे गेलों.

तेथें गेलों तों साहेब अगदीं खूप दिसले. मला जे कामगार तेथें बोलावण्यास आले होते त्यांजकडे बोट दाखवून साहेब ह्मणाले, हे गृहस्थ तुमच्या ओळखीचे आहेत काय ? तेव्हां ओळखीचे नाहींत असें सांगितल्यावरून साहेब ह्मणाले, हे माझे विश्वासू नोकर आहेत, व तुह्मी गोवळकोंड्यांत फिरत असतां माझ्या हुकुमावरून ते वेष पालटून नेहमीं तुमचेजवळ असत. तुमच्या प्रामाणिकपणाबद्दल त्यांनींही मला फार सांगितलें. नंतर नबाबसाहेबांनीं सर्वांस बाहेर जावयास सांगितलें व मला ते ह्मणाले, तुमची बुद्धिमत्ता व नीति हीं पाहून आह्मांला अशी इच्छा झाली आहे कीं आमच्या राज्यांत तुह्मीं आणखी कांहीं वर्षे नोकरी करावी; व हें ह्मणणें कबूल केल्यास तुह्मांस पुढें जन्मपर्यंत पैशाची तूट ह्मणून कधीं पडणार नाहीं.

ते ह्मणाले, आमच्या खजिन्याची स्थिति चांगली नाहीं. मुख्य बाब हिऱ्यांच्या खाणीचें उत्पन्न. परंतु तेथें सगळी लबाडी चालते. सध्या तेथें देखरेख परशुरामपंतांची आहे. त्यांनीं आह्मांस उक्ती रक्कम द्यावी व शिवाय अमुक वजनाचे व आकाराचे आंतले हिरे त्यांनीं ठेवावे, व अमुक वजनाच्या व आकाराच्या बाहेरचे आह्मांकडे पाठवावे, असे करार ठरले आहेत. परंतु हे करार मुळींच पाळले नाहींत. तेथले मजूर त्यांच्यावरच्या कामगारांस फसवितात, ते कामगार व्यापाऱ्यांस फसवितात, व्यापारी मक्तेदार परशुरामपंत यांस फसवितात, व मक्तेदार आमच्या हातावर तुरी देतात, अशी एकसारखी मोटिंगबादशाही चालली आहे. ज्याला जसें वाटेल तसें तो करतो. कित्येकदां तर

मीं अशी प्रचीति पाहिली आहे कीं, मक्तेदारांस विचारलें असतां मोठाले हिरेच निघत नाहींत, असें ते सांगतात, व व्यापारी खूप मोठाले पैलूदार व सतेज हिरे मजकडे विकावयास आणतात!

त्यांनीं मजवर फारच जोखमीचें काम सोंपविलें. तें असें:—कारखाना बंद झाल्यावर रात्रीं तेथें गुपचिप जावें. वाळूंत मिसळलेले हिरे धुवून पहात जावे, व काय जी लबाडी दृष्टीस पडेल ती आमच्या नजरेस आणावी. परंतु हें काम मला आवडलें नाहीं. कारण, एक तर लोकांच्या तिरस्कारास पात्र व्हावयाचें; व हे गुप्त बातमीदार ह्मणून ज्यांनीं त्यांनीं नाकें मुरडावयाचीं, व एखादें लचांड उद्भवलें ह्मणजे प्रसंगानुसार जिवावर येऊन बेतायाची. मीं ही हकीकत व माझे हेतु त्यांस सांगितले. परंतु त्या ह्मणण्यास न जुमानतां मी तुमच्या केंसासही धक्का लागूं देणार नाहीं, असें त्यांनीं मला सांगितलें. तरी मीं त्यांचें ह्मणणें नाकबूल केलें. यामुळें ते मजवर अतिशय रागावले. तेव्हां त्यांचा राग शांत करण्याची मीं युक्ति योजिली. ती अशी. मीं ह्मटलें:—हुजूर, आपण मला सांगतां कीं खाणींतल्या लबाड्या दृष्टोत्पत्तीस आणून तशा तऱ्हेनें होणारें नुकसान बंद करावें पण त्या कामीं सरकार जो खर्च करणार, त्या मानानें फायदा फार होणार नाहीं, करतां सरकारच्या तिजोरींत खूप शिल्लक राहाण्यास दुसरा एक अजब उपाय आहे. मीं सर्व खाणी पाहिल्या त्यांत एक उत्तम हिऱ्यांची खाण खालीं पाणी लागेपर्यंत खोल खणली आहे, व तें पाणी काढून टाकण्याचीं यंत्रें नीट नसल्यामुळें तो कारखाना मुळींच बंद पडला आहे. आतां पाहिलें तों पाण्याचा लोट खूप जोरानें तेथून निघून दुसरीकडे जात आहे; तेव्हां अशा ठिकाणीं आमच्या संस्थानांतून अगर कथीलपुराहून उत्तम यंत्रें आणून सरकाराकरतां पाणचक्की येथें सुरू करावी, असें माझ्या मनांत आहे.

भाग पंधरावा.

वाघ आणि जुलमी राजे यांचें मित्रत्व फार धोक्याचें असतें.

नवाबसाहेबांनीं माझी ही सूचना मान्य केली. परंतु, त्यांची बुद्धि केव्हां फिरेल याचा कांहीं नेम नाहीं व कदाचित् पुढें मागें हे माझा अपमान करतील असें मनांत येऊन मीं त्यांस सांगितलें कीं, हें काम फार मेहेनतीचें व खर्चाचें आहे. तेव्हां येथून जाण्यापूर्वीं निदान मला एक वर्षाचा तरी पगार आधीं मिळावा, व पुढें पगार जर नियमित मिळाला नाहीं तर मला राजीनामा देण्याची परवानगी असावी. हें ह्मणणेंही त्यांनीं कबूल केलें, त्या वेळीं त्यांचे चिरंजीव तेथेंच होते. मला लागलीच कामास सुरवात करण्याची परवानगी मिळाली. त्या कामीं मला किती श्रम पडले हें सांगतां येत नाहीं. परंतु मीं तेथलींच कांहीं यंत्रें सुधारून पाणचक्की सुरू केली. पुढें त्या खाणींत फार फार किंमतीचे हिरे आहेत, असें स्पष्ट दिसूं लागल्यामुळें तेथलें पाणी लौकर उपसून काढण्याचा प्रयत्न आह्मीं चालू केला. ह्या तीन वर्षांत माझा पगार मला नियमानें मिळत असे, व धर्मचंदभाईनीं मला बरेंच व्याज देऊं केल्यामुळें ती सर्व रक्कम त्यांच्याचजवळ मी देत असें. काटकसरीनें खर्च करण्याची संवय लागल्यामुळें मला भाईच्या जवळून फारच थोडे पैसे घ्यावे लागत.

येथें एक गोष्ट सांगितल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं. ती ही कीं, माझ्या हातीं विलक्षण सत्ता असतां मीं अन्यायानें पैसे मिळविले नाहींत. माझ्या पदरीं जे गुलाम ह्मणून नोकरीस होते, त्यांच्याशीं माझें वर्तन पाहून इतर लोकांस फार वाईट वाटे. त्या गुलामांचें प्रेम मजवर वाढूं लागलें, हें पाहून खाणींतले इतर अधिकारी व शहरचे व्यापारी हे माझा द्वेष करूं लागले.

व मी तेथून कधीं जाईन असें त्यांस झालें. कारण ते गुलामांस वाईट रीतीनें वागवीत असत, यामुळें तेच तिरस्कारास पात्र होऊं लागले. माझ्या कांहीं विश्वासू व शहाण्या गुलामांनीं माझा जीव धोक्यांत आहे असेंही सुचविलें. परंतु मजबद्दल ते फार काळजी बाळगीत असत, यामुळें मला कांहीं विशेष भय वाटलें नाहीं.

मीं त्या बिचाऱ्यांच्या दुःखविमोचनार्थ पुष्कळ खटपटी केल्या. परंतु त्यामुळें मजबद्दल इतर लोकांत विनाकारण संशय मात्र वाढूं लागला. त्या गुलामांच्या आंगावर एका लंगोटीखेरीज कांहीं दिसत नसे. दुसरें वस्त्र आंगावर दिसण्याचा उशीर कीं यजमानानें हा श्रीमान् झाला असें समजून जुलुमानें त्याचे पैसे बुचाडावे. मग अशा त्रासाला कंटाळून त्यांच्यापैकीं जे शहाणे असत ते वेळ साधून खाणींत काम करतांना एखादा चांगलासा हिरा छपवून ठेवीत, व हद्दपार पळून जाऊन तो विकून भाजीभाकर सुखानें खात.

ह्या गुलामांची दाद घेण्याकरतां मीं नबाबसाहेबांची वारंवार विनंती केली. तेव्हां त्यांनीं मला एकदां असें कळविलें कीं, अमुक आकाराचा व वजनाचा हिरा सांपडल्याखेरीज तुमचें म्हणणें मान्य होणार नाहीं. मीं तेथील मजूरांस ती अट सांगितली, तेव्हां त्यांनीं अतिशय मेहेनतीनें काम चालविलें. सरतेशेवटीं त्यांनीं सांगितल्यापेक्षांही मोठा व वजनदार असा एक हिरा सांपडला. तो अतिशय कठीण असून त्याची बैठक फारच सुरेख होती, व त्याचा रंग गुलाबी होता. कोहिनूर हिरा वापरणाऱ्या पंजाबच्या धन्य वीरासही झाला नसेल इतका आनंद मला तो हिरा पाहून झाला, व त्यामुळें मजूरलोकांस एक प्रकारची आशा उत्पन्न झाली.

मी लागलीच दरबारीं जाण्याकरतां निघालों. तेथें पोहोंचलों तों रात्र झाली होती, म्हणून हिशेब पुरा करण्याकरतां मी

धर्मचंदभाईकडे गेलों. त्यांनीं माझें स्वागत केलें, व सांगितलें कीं, आपले होन व रुपये यांच्या ठेवीवर मीं पुष्कळ पैसे मिळविले. करतां आज व्याजासह आपला हिशेब पुरा करून देऊन तुमच्या ओळखीचे शेटजी संस्थानांत आहेत त्यांजवर हुंडी देतों. असें ह्मणून त्यांनीं मजजवळ दर्शनी हुंडी दिली.

याप्रमाणें व्यवस्था झाल्यावर मीं तेथें येण्याचा उद्देश त्यांस कळवून तो नवीन हिरा दाखविला. तो पाहातांच अत्यानंदानें ते ह्मणाले, हा हिरा तुह्मी आपल्याजवळ ठेवा, माझ्यावर भरंवसा असूं द्या. कारण नबाबसाहेबांस मी पुरा ओळखतों. ते गुलामांची मुक्तता करणार नाहींत. शिवाय तुह्मांला तरी ही रिकामी दगदग हवी कशाला? तुह्मी आपल्या गांवीं गेलां, ह्मणजे तुह्मांला इकडची आठवण सुद्धां होणार नाहीं. आजपर्यंत मिळविलेल्या पैशावर खुशाल मौजा मारीत बसाल!! करतां आतां असें करा कीं येथून रात्रींच्या रात्रीं पळून जा. मजजवळ एक विश्वासू गुलाम आहे, तो तुह्मांला सुरक्षित नेऊन पोहोंचवील. नबाबसाहेब तुह्मी गोवळकोंड्यांत आहां असेंच समजतील. बाकी खरी बातमी काय ती मला एकट्यालाच माहीत.

इतकें ह्मणून त्यांनीं टाळी वाजविली तों एक गुलाम आला व त्यानें माझ्या जाण्याची तयारी केली. परंतु मीं जेव्हां निक्षून सांगितलें कीं साहेबांस हिरा नजर केल्याखेरीज मला कोणतीही गोष्ट कर्तव्य नाहीं, तेव्हां भाई मजकडे संशययुक्त मुद्रेनें पाहूं लागले.

माझी अशी इच्छा पाहून धर्मचंदभाई ह्मणाले, तर मग आपला निश्चय कायमचा दिसतो. बरें तर, आतां थोडें सरबत व मिठाई घ्या, असें ह्मणून त्यांनीं ताटें आणविलीं तेव्हां मीं अल्पाहार केला.

दुसरे दिवशीं सकाळीं मी नबाबसाहेबांकडे गेलों, तों त्यांनीं मला एकीकडे बोलावलें, व आह्मी दोघे त्यांच्या चिरंजीवांच्या

खोलींत गेलों. मीं हळू हळू भाषणास सुरवात केली, साहेबांस खाणीबद्दल हकीकत सांगितली व मध्येंच एक निळा हिरा दाखविला, व हा आपल्या छोट्या साहेबांकरतां आणला आहे असें सांगितलें. तो पाहून साहेब खूष झाले. तेव्हां दुसरा दाखविल्यावर ते फारच खूष होतील असें मला वाटलें. ह्मणून मीं त्यांच्या वचनाची गोष्ट काढली, तेव्हां ते ह्मणाले, आह्मीं सांगितल्याप्रमाणें हिरा काढा, ह्मणजे तुमचें ह्मणणें कबूल असें ह्मणतांच मीं गुलाबी हिरा काढला. तो पाहून त्यांचा आनंद गगनांत मावेनासा झाला. त्यांनीं त्याचें वजन केलें, व तो हवा त्यापेक्षांही जास्त वजनाचा भरला तेव्हां ते ह्मणाले, तुह्मी गुलामांच्या मुक्ततेकरतां इतकी खटपट कां करतां हें मला समजत नाहीं, पण मीं आजपासून त्या सर्वांस बंधमुक्त केलें आहे.

नबाबसाहेबांच्या मुलाचें मत वडिलांप्रमाणें नव्हतें असें दिसलें. वडील तो हिरा पाहाण्यांत गुंतले असतां त्यांच्या मुलानें मजकडे प्रेमळ बुद्धीनें पाहिलें, व जो निळा हिरा मीं त्यांस नजर केला होता तोच त्यांनीं मला बक्षिस दिला ! ! थोरांची देणगी थोरच.

नबाबांच्या हुकुमावरून चिटणिसांनीं लागलीच खाणीवरील अधिकाऱ्यांस हुकूम दिले कीं, आमच्या फायद्यापैकीं कांहीं भाग मजूरांस वांटून द्यावा, व त्यांस बंधमुक्त करावें. त्यांच्याजवळून मालकीच्या नात्यानें कर घेऊं नये, व त्यांनीं मिळविलेले कपडेलत्ते, जमीनजुमला यांजवर त्यांचीच मालकी असावी. त्या हुकुमावर नबाबसाहेबांच्या सह्या होतांच मला फार आनंद झाला. ते हुकूम तिकडे नेण्याचें काम मीं पतकरलें, व जरी माझी संस्थानांत जाण्याची अगदीं तयारी झाली होती, तरी ती सुवार्ता तेथल्या गांजलेल्या लोकांस कळविण्याची व त्यांना मोठ्या सुखकारक स्थितींत पाहाण्याची मला अतिशय इच्छा झाली. अहाहा!

तेथल्या मंडळीस ती आनंदाची खबर कळल्यावर त्यांचे ते आनंदी चेहेरे पाहून मला जो हर्ष झाला त्या वेळचा देखावा मी कधींही विसरणार नाहीं ! !

दुसरे दिवशीं सकाळीं जागा होतों तों दरवाज्याच्या बाहेर लोकांची एकच गर्दी. जिकडेतिकडे माझ्या नांवाचा जयजयकार चालला होता. मी दाराबाहेर येतांच मजभोंवतीं सगळे गुलाम जमले, व त्यांना मिळालेल्या नफ्यापैकीं प्रत्येकजण मला कांहीं तरी देऊं लागला. तेव्हां त्या नजराण्यांचा मीं आभारपूर्वक स्वीकार करून ज्याची त्यास रक्कम परत दिली. तिसरे दिवशीं त्यांच्या मेजवान्या झाल्या, व थोडेसे पैसे खर्च करून प्रत्येकानें कोणत्या तरी रंगाच्या छिटाची बंडी आंगांत घातली. मीं पूर्वी तेथें पाय ठेवल्यापासून ती मंडळी आजच काय ती कपडे घातलेली दृष्टीस पडली, तेव्हां मला जो आनंद झाला, त्याचें वर्णन करणें अशक्य आहे. कांहीं वेळानें मी दूर एका वडाच्या झाडाखालीं त्या आनंदी मंडळीकडे पहात उभा असतां मागून एकानें मला ठोसा दिला, त्यासरसा मी खालीं पडलों, इतक्यांत एकानें माझ्या हातांतली आंगठी काढून घेतली. मग चार हत्यारबंद शिपायांनीं व एका चाकरानें मला एकदम उचलून नेलें, आणि तेथल्या एका अधिकाऱ्याच्या घरीं कोंडून ठेविलें. मग त्यांच्यांतला एक शिपाई ह्मणाला, आतां तेथें तुह्मी स्वस्थ असा. नवाबसाहेबांशीं विश्वासघातानें वागलें ह्मणजे असा परिणाम होतो. त्यांत अतिशय आश्चर्याची गोष्ट ही वाटली कीं, ज्या सांवळ्या नांवाच्या गुलामाचे प्राण मीं तारायंत्राच्या प्रकरणांत वांचविले होते तो त्या ठिकाणीं रखवालदार होता. त्यास मीं कितीक प्रश्न विचारले, परंतु एकाचेंही उत्तर त्यानें दिलें नाहीं. तो एवढें मात्र ह्मणाला कीं. नवाबांच्या इच्छेपुढें नाइलाज आहे!

नंतर एकानें माझ्या खोलीचें दार लावलें, व तो निघून गेला. मग मी आपल्याशीं ह्मणालों, अरेरे, मीं इमानेंइतबारें चाकरी केली, त्याचें हें मला बक्षीस काय ? मी जर आपल्या महाराष्ट्रांत असतों, तर निवळ अशा इमामांच्या हुकुमानें बंदींत राहिलों असतों काय ? माझा अपराध काय व तो सिद्ध करून दाखविणारा कोण याचा मला पत्ता लागला नसता काय ? माझ्या जन्मांत हा जो अतिशय कठिण प्रसंगाचा दिवस मजवर आला त्याचें वर्णन माझ्याच्यानें करवत नाहीं. उपाशीं असल्यामुळें माझी हातपाय हालविण्याचीही शक्ति नाहींशी झाली, आणि ह्मणून मग मी निचेष्ट पडलों. अशा स्थितींत मध्यरात्र उलटली, तों दाराशीं कोणी खडबडतें आहे, असें मला वाटलें. इतक्यांत एका हातांत दिवा व दुसऱ्या हातांत उत्तम मिटाईचें भरलेलें ताट घेऊन सांवळ्या दार उघडून आंत आला, व गुपचिप माझ्यासमोर उभा राहिला. मीं त्याच्याकडे तिरस्कारयुक्त मुद्रेनें पाहिलें, व कृतघ्नपणाबद्दल त्याची निर्भर्त्सना करणार, इतक्यांत त्याचे डोळे पाण्यानें भरून आले, व त्यानें माझ्या पायांवर डोकें ठेवलें.

तो ह्मणाला, महाराज, या दासाबद्दल आपल्या मनांत शंका येणें बरोबर होईल काय ? आपण मला जीवदान दिलें, ह्मणून मीही आपल्या बचावास आलों आहें. पण महाराज, आधीं थोडें यांतलें खावें, ह्मणजे आपल्यास हुषारी येईल. सूर्योदयापूर्वी आपल्यास येथून बरेंच लांब गेलें पाहिजे. ह्मणून पोटभर खाल्ल्याखेरीज आपल्यास प्रवासाचे श्रम सोसवणार नाहींत

मग मी फराळ करूं लागलों, तेव्हां सांवळ्या ह्मणाला, महाराज, या सर्व संकटाचें मूळकारण आपला ज्यांच्यावर फार विश्वास होता, ते धर्मचंदभाई होत. आपली संपत्ति गिळंकृत करण्याच्या उद्देशानें ते नवाबसाहेबांस भेटले, व ह्मणाले, हुजूर, एक गोष्ट सांगतों. माफी असावी. आपला ज्यांच्यावर पूर्ण वि-

खास बसला आहे, त्या जनार्दनपंतांनीं मोठमोठ्या किंमतीचे ब-रेच हिरे लांबविले आहेत. ते माझ्या एकदां सहज नजरेस आले, ह्मणून आपल्यास वर्दी दिली. अशाच आणखी कांहीं खोट्या-नाट्या गप्पा त्यांनीं साहेबांस सांगितल्या. त्या भाषणांनीं नबा-बसाहेबांच्या पायांची आग मस्तकास चढली, व जनार्दनपंतांस खाऊं का गिळूं असें त्यांस झालें. त्यांनीं चार शिपायांस ता-कीद दिली कीं, पंत जेथें असतील तेथें त्यांचा शोध करून त्यांस ताबडतोब अटकेंत ठेवावें, व चोरलेल्या हिऱ्यांचा पत्ता सांगे-पर्यंत त्यांस सोडूं नये. हा हुकूम फर्मावला, तेव्हां मी तेथेंच होतों. मी तडक तेथून निघालों तो छोट्या नबाबसाहेबांस भेटलों, व आपल्यावर त्यांची मेहेरनजर असल्यामुळें सर्व हकी-कत त्यांस मीं सांगितली. त्यांनीं लागलीच धर्मचंदास बोलावलें, व पुष्कळ तऱ्हेचे प्रश्न केले, त्यावरून आपल्या निरपराधाबद्दल त्यांची खात्री होऊन, धर्मचंदास त्यांनीं जावयास सांगितलें. नं-तर त्या शिपायांस छोट्या साहेबांनीं सांगितलें कीं, तुह्मी पंतांचा शोध करून त्यांस सांवळयाच्या ताब्यांत द्या. शिपायांनीं मु-लाची आज्ञा तीच नबाबसाहेबांची समजून, आपल्यास येथें ठेवल्यावर किल्ल्या माझ्या स्वाधीन केल्या.

इतकें भाषण झाल्यावर सांवळयानें माझी आंगठी मला दिली, व सांगितलें कीं महाराज, ही त्या धांदलींत इतर कोणीं लांब-विली असती ह्मणून मीं ती काढून घेतली.

त्या कृतज्ञ सांवळयानें बाहेर उत्तम दोन घोडे तयार करून ठेवले होते, त्यांजवर बसून आह्मीं सुखरूपपणें नबाबांच्या राज्या-बाहेर निघून गेलों. हळू हळू आह्मी आपल्या संस्थानांत पोहीं-चलों. तेथें बाळासाहेबांनीं मोठ्या ममतेनें माझें स्वागत केलें, माझी सर्व हकीकत ऐकिली; व ईश्वराच्या दयेनें हा सुदिन दृष्टीस पडला ह्मणून त्याची आह्मीं सर्वांनीं प्रार्थना केली.

मजजवळ कल्पनपक्षा पुष्कळ जास्त सपाचे झाला होता. का
धर्मचंदभाईची दर्शनीहुंडी मजजवळ होती. तिचे सर्व रुपये
हांच पटले. माझी बहुमोल हिऱ्याची आंगठी मीं बऱ्याच हजार
पयांस त्या संस्थानच्या सरदारास विकली. संस्थानांतून घरीं जा-
पूर्वी एक आनंदाची बातमी कळली कीं, छोट्या साहेबांनीं ध-
चंदभाईचें दुष्ट कृत्य नबाबसाहेबांच्या दृष्टोत्पत्तीस आणलें व
टर्जीस योग्य शासन मिळालें, व आपल्या हातून एक उत्तम थोर
ुष्य नाखूष होऊन परत गेला याजबद्दल त्यांस फार वाईट वाटलें
मग मी सांवळ्यास मोठें बक्षिस देऊं लागलों परंतु त्याचा तो
गीकार करीना. ज्यानें मला जीवदान दिलें, त्याच्यापासून
क्षिस घेणें मोठें लांछन आहे, असें ह्मणून मजबरोबर माझ्या
वीं येण्याची इच्छा त्यानें प्रदर्शित केली. मीं त्याचें ह्मणणें
बूल केलें. आणि मग मोठ्या प्रेमानें बाळासाहेबांचा निरोप
ऊन मोठ्या आनंदानें इकडे यावयास निघालों.

ईश्वरकरणी अगाध आहे! त्याच्याच कृपेनें आज मी येथें
चनपुरास सुखी आहें. मजजवळ पैसे रगड आहेत व माझें
निर्मळ आहे. तेव्हां ज्या थोर यजमानांनीं ह्मणजे रघुनाथ
ांनीं मजवर प्रेम केलें, व औदार्यानें वागविलें, त्यांच्याच कृ
मी आज या योग्यतेस चढलों, हें कळविण्यास मला अत्या
होत आहे.—

आपली अशी स्तुति चालली आहे असें पाहून रघुनाथ
येंच उठले, व ह्मणाले, गृहस्थहो, भोजनोत्तर मी ह्मणालों की
याला नेहमीं असेंच यश प्राप्त होवो' त्याचा अर्थ आतां तु
स चांगला कळला असेल. असें ह्मणतांच सर्वजण 'जनार्द
यांचें सदैव असेंच कल्याण होवो' असें ह्मणाले, व अ
वि, पानसुपारी वगैरे होऊन मंडळी आपापल्या घरीं गेली